दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६९ | सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
-संपादक

## थोडक्यात...

### लोकलमध्ये प्राध्यापकाला भरगर्दीत संपवलं

मुंबई: मुंबईच्या मालाड रेल्वे स्थानकात शनिवारी संध्याकाळी आलोक सिंह (३१) या महाविद्यालयात शिकवणाऱ्या प्राध्यापकाची चाकुने हल्ला करून हत्या करण्यात आली आहे. लोकलमधून उतरताना झालेल्या एका क्षुल्लक वादात ही हत्या झाल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी आरोपी ओंकार शिंदे (२७) याला अटक केली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मालाड रेल्वे स्थानकात उतरत असताना अलोक सिंह यांचा गर्दीमुळे दुसऱ्या एका प्रवाशाला धक्का लागला. यावरुन दोघांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. मात्र, रागाच्या भरात असलेल्या आरोपी ओंकार शिंदेने अलोक सिंग यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यांना तातडीने रुग्णालयात हालवण्यात आले. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. हल्ल्यानंतर आरोपी ओंकार शिंदे गर्दीचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला होता.

### न्यायाधीशांच्या बदलीत केंद्र सरकारचा हस्तक्षेप–गवई

नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायमूर्ती उज्वल भुयान यांनी माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या कार्यकाळात घेतलेल्या कॉलेजियमच्या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. कॉलेजियम व्यवस्थेत कार्यकारी यंत्रणेच्या हस्तक्षेपावर त्यांनी उघड टीका केली. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अतुल श्रीधरन यांची बदली केंद्र सरकारच्या विनंतीवरून अलाहाबाद उच्च न्यायालयात केली होती, अशी स्पष्ट कबुली माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी दिली. यावरून आता वाद निर्माण झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्वल भुयान यांनी हे कॉलेजियमच्या निर्णयांवर सरकारच्या प्रभावाची स्पष्ट कबुली असल्याचे म्हटले. त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

### उसाला तुरे आल्याने उत्पादनात घटीची भीती

पुणे: सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असून ऊस तोडणीला वेग आला आहे. मात्र हा वेग शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरण्याऐवजी आर्थिक अडवणूक आणि लुटीचा नवा अध्याय ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. ऊस तोडणी मिळण्यापासून ते कारखान्याच्या गेटपर्यंत पोहोचेपर्यंत शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. त्यातच उसाला तुरे आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे. राज्यात अनेक ठिकाणी ऊस पिकाला मोठ्या प्रमाणात तुरे आल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांतील वातावरणातील बदलाचा प्रतिकूल परिणाम पिकांवर झाला आहे. गळीत हंगाम सुरू असूनही अनेक शेतकऱ्यांना वेळेवर ऊस तोड मिळत नाही. त्यातच उसाला तुरे आल्यामुळे वजन कमी होणार असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### राजदच्या कार्यकारी अध्यक्षपदी तेजस्वी यादव

पाटना: राष्ट्रीय जनता दलाचे नवे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून तेजस्वी यादव यांची निवड झाली आहे. रविवारी पाटणा येथे राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत लालू प्रसाद यादव, राबडी देवी आणि मीसा भारती यांच्यासह पक्षाचे जवळजवळ सर्व मोठे नेते उपस्थित होते. बैठकीदरम्यान, राजदचे बिहार प्रदेश अध्यक्ष मंगणी लाल मंडल यांनी याची घोषणा केली. पाटणा येथील एका हॉटेलमध्ये झालेल्या राजद राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत भोला यादव यांनी हा प्रस्ताव मांडला. लालू प्रसाद यांच्या सूचनेनुसार मांडण्यात आलेल्या या प्रस्तावाला कार्यकारी सदस्यांनी हात वर करून पाठिंबा दिला. लालू प्रसाद यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे पक्षाने पहिल्यांदाच कार्यवाहक अध्यक्ष निवडला आहे. तेजस्वी यांना अध्यक्षाचे सर्व अधिकार देण्यात आले आहेत. राजद नेत्याने सांगितले की, बैठकीत उपस्थित असलेल्या जवळजवळ सर्व नेत्यांनी तेजस्वी यादव यांना जबाबदारी देण्याची मागणी केली.

### सुट्टीची सुचना

**आज दि. २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या दि. २७ जानेवारी २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**–व्यवस्थापक**

# २६९६ कोटी रुपयांच्या तूर खरेदीला केंद्राची मंजुरी

## महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यातील ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंजुरी दिली आहे.**

नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे किंमत समर्थन योजनेअंतर्गत सुमारे २,६९६ कोटी रुपयांच्या निधीतून ही तूर खरेदी केली जाणार असून, याचा थेट लाभ राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मिळणार आहे.या बैठकीस महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल आणि केंद्रीय कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. तूर खरेदीच्या या निर्णयामुळे केंद्रावर मोठा आर्थिक भार पडणार असला, तरी शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. ही खरेदी प्रक्रिया नेफेड आणि एनसीसीएफ या संस्थांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या समन्वयाने राबवली जाईल, असे मंत्री चौहान यांनी स्पष्ट केले. खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही मंत्र्यांनी यावेळी दिल्या. शेतकऱ्यांची नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये आणि बिचौलियांचा हस्तक्षेप पूर्णपणे थांबवावा, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच,






▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, श्रीरंग लाड यांसह चौघांना 'पद्मश्री' जाहीर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने २०२६ वर्षासाठीच्या प्रतिष्ठित पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यावर्षी ४५ मान्यवरांचा पद्म पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. या मानाच्या यादीत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील दिग्गजांना पुरस्कार मिळाले आहेत. त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील तमाशा कलावंत रघुवीर खेडकर, परभणी जिल्ह्यातील शेतकरी श्रीरंग लाड यांचा समावेश आहे.

देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानामध्ये समाविष्ट असलेला पद्म पुरस्कार पद्मश्री,



पद्मभूषण आणि पद्मविभूषण अशा ३ श्रेणींमध्ये दिला जातो. कला, समाजसेवा, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, उद्योग, वैद्यक, साहित्य, शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा अशा विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जातात. यावर्षी महाराष्ट्रातील तिघांना आपापल्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीसाठी पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत नगर जिल्ह्यातील तमाशा परंपरेचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे ज्येष्ठ लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'रघुवीर खेडकर आणि कांताबाई सातारकर' या तमाशा मंडळाच्या माध्यमातून त्यांनी लोककलेची सेवा केली. तमाशासारख्या ग्रामीण कलेला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा असून, त्यांच्या या गौरवामुळे संपूर्ण लोककला विश्वात आनंदाचे वातावरण

▶▶ पान २ वर

# खटला सुरू असताना सरन्यायधीशांना उपमुख्यमंत्री शिंदेचे भेटणे चुकीचे

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या साडेतीन वर्षांपासून शिवसेना कोणाची, हा खटला सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत हे तारीख पे तारीख देत आहेत. शनिवारी (दि. २४) ते मुंबईत आले होते. प्रोटोकॉलनुसार त्यांच्या स्वागतासाठी त्या विभागाच्या सचिवांनी जाणे अपेक्षित होते, मात्र राजकीय लोक त्यांच्या स्वागताला गेले. ताज पॅलेसमध्ये भेट मिळावी म्हणून एकनाथ शिंदे तिथे बराच वेळ होते. शिवसेना पक्ष–चिन्हांचा खटला सुरू असताना सूर्य कांत यांनी एकनाथ शिंदेंची भेट घेणे चूक आहे. न्यायमूर्ती सूर्य कांत यांना राजकारणात यायचे आहे, म्हणून हे सगळे करत आहेत, असा गंभीर आरोप



ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी (दि. २५) माध्यमांशी बोलताना केला.

संजय राऊत माध्यमांशी बोलताना म्हणाले की, "न्यायमूर्ती सूर्यकांत शनिवारी मुंबईत आले होते. प्रोटोकॉलनुसार विभागाच्या सचिवांनी त्यांचे स्वागत करणे अपेक्षित होते,

▶▶ पान २ वर

# मतदार हे लोकशाहीचा आत्मा!

## २०२६ च्या पहिल्या 'मन की बात' मधून पंतप्रधान मोदी यांच्याकडून मार्गदर्शन

दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान मोदी यांनी मन की बातमधून देशाला संबोधित करताना, २५ जानेवारी हा दिवस देखील एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे कारण तो राष्ट्रीय मतदार दिन आहे. मतदार हे लोकशाहीचा आत्मा आहेत. जेव्हा जेव्हा एखादा तरुण पहिल्यांदाच मतदार बनतो तेव्हा संपूर्ण परिसर, गाव किंवा शहराने त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि मिठाई वाटण्यासाठी



एकत्र यावे. यामुळे मतदानाबद्दल जनजागृती वाढेल. १८ वर्षांचा झाल्यावर मतदार म्हणून नोंदणी करा" असे आवाहन त्यांनी केले.

▶▶ पान २ वर

# एसटीची मदार कंत्राटी कर्मचाऱ्यांवरच!

## नवीन बसेस येणार मात्र कर्मचाऱ्यांची टंचाई सुरूच

मुंबई । प्रतिनिधी

एसटीच्या ताफ्यात लवकरच तब्बल ८००० स्वमालकीच्या नव्या गाड्या दाखल होणार आहेत. त्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. प्रवाशांसाठी ही मोठी आनंदाची बाब असली तरी एसटीच्या नव्या गाड्यांवर चालक–वाहक मात्र कंत्राटी



असणार आहेत. त्यामुळे एसटीसमोर हे मोठे आव्हान ठरणार आहे.

एसटीच्या गाड्यांचा ताफा वाढत असून येत्या दोन, तीन वर्षात नवीन बसेसचा आकडा २४ हजारांपलीकडे जाणार असल्याचे सांगण्यात येते. कधीकाळी एसटीकडे सर्वात जास्त म्हणजेच १८,८०० गाड्या होत्या. त्यात कमी होत तो आकडा १४००० पर्यंत आला. पण पण आता मात्र हा अकडा २४,००० पर्यंत नेण्याचे नियोजन सुरू आहे. स्वमालकीच्या ३००० गाड्यांना वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. ५००० स्वमालकीच्या नवीन गाड्यांची निविदा अंतिम टप्प्यात असून या डिसेंबर महिन्यात त्याचे प्रिबीड करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे ५००० जुन्या गाड्यांचे एलएनजीमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे.

▶▶ पान २ वर

# मुंब्रा टू महाराष्ट्र : कैसा हराया! ते हरा करेंगे

सुभाष चौरे । बीड




नुकताच राज्यातील महानगरपालिकेचा निकाल लागला. महायुतीने मोठे यश मिळवले त्याची चर्चा नाही मात्र मुंबईतील मुंब्रा येथे एमआयएमचा विजय झाल्यानंतर नगरसेविका सहर शेख यांचे भाषण चांगलेच चर्चेत आले. कैसा हराया हेच भाषण महाराष्ट्रात व्हायरल झाले. विशेष म्हणजे यानंतर केवळ मुंब्राच नव्हे महाराष्ट्र हिरवा करू असे वक्तव्य इम्तियाज जलील यांनी केले. हिरवा करू म्हणजे मुस्लिम युक्त नव्हे तर त्या पक्षाचा रंग हिरवा आहे म्हणून ते वक्तव्य केले असले तरी त्याला मात्र जातीय रंग अपेक्षेप्रमाणे राजकारण्यांनी लावला.

राज्यातील रखडलेल्या महानगरपालिकांच्या निवडणूका तब्बल पाच वर्षानंतर झाल्या. या निवडणुकीमध्ये भाजप महायुतीने घवघवीत असे यश मिळवले विशेष म्हणजे अनेक ठिकाणी महायुतीने मैत्रीपूर्ण लढती लढलेली असतानाही हे यश मिळाले. त्यात भाजप प्रथम क्रमांकावर राहिला. या निवडणुकीमध्ये चर्चेचा विषय ठरला तो मुंब्रा मतदार संघ. मुंब्रा हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचा हा पारंपारिक मतदार संघ. या मतदारसंघात मुस्लिम मतदार संख्या मोठ्या संख्येने आहेत, मात्र यावेळी येथील मतदारांनाच आव्हाड नको होते की काय म्हणून गेले अनेक वर्ष त्यांच्या सोबतच असलेल्या सहकाऱ्यांनी वेगळी चूल रचली ती म्हणजे एमआयएम.

▶▶ पान २ वर

### जितेंद्र आव्हाडांसाठी धोक्याची घंटा

पारंपारिक मतदार संघ आणि गेल्या अनेक वर्षापासून मुंब्रा मतदार संघावर वर्चस्व असलेले लोकप्रतिनिधी जितेंद्र आव्हाड यांना मात्र यावेळी एमआयएमने मिळवलेला विजय ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. कारण या मतदारसंघांमध्ये मुस्लिम मतदार संख्या बहुसंख्य असल्याने आणि एमआयएमने आपली ध्येय निश्चित केल्यामुळे, भविष्यात जितेंद्र आव्हाड यांना अडचणीचे ठरू शकते.

# देशातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या समस्येवर राहुल गांधी यांना चिंता

दिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या समस्येवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हवेच्या प्रदूषणामुळे आज सामान्य जनतेला आपल्या आरोग्याची आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची मोठी किंमत मोजावी लागत आहे, अशा शब्दांत त्यांनी या गंभीर संकटाकडे लक्ष वेधले.**

या समस्येचा सर्वाधिक फटका लहान मुले आणि वृद्धांना बसत असून, याविरोधात आता आवाज उठवण्याची वेळ आली असल्याचे आवाहन त्यांनी जनतेला



केले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या एक्स (ट्विटर) अकाऊंटवरून जनतेला या प्रश्नावर आवाज उठवण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले की, कोट्यवधी भारतीयांच्या दैनंदिन जीवनावर प्रदूषणाचे सावट असून, यामुळे केवळ आरोग्यच नव्हे तर लोकांची

▶▶ पान २ वर






## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

## अग्रलेख

# पुन्हा पुन्हा भयंकर

पुन्हा एकदा बदलापूर घटनेने लोक हादरले आहेत. चार वर्षाच्या चिमुकलीच्या विनयभंगाचा प्रकार उघडकीस आला. नर्सरीत शिकणारी ती नेहमीच्या वेळेपेक्षा उशीरा भेदरलेल्या अवस्थेत घरी आल्याने पालकांना संशय आला. अधिक चौकशीनंतर हा प्रकार उघडकीस आला. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या गाडीच्या चालकाने मुलीशी अनुचित वर्तन केल्याचे उघड झाले. यामुळे अनेकांना दोन वर्षांपूर्वी घडलेली घटना आठवली असेल. अशा संवेदनशील आणि मुलीचे भावविश्व उद्ध्वस्त करणाऱ्या घटनांसंदर्भात व्यवस्थांची बेपर्वा वृत्ती याहीवेळी अनुभवास आली. अनुचित प्रकार घडल्याचा संशय आल्यामुळे पालक शाळेत गेले. तथापि, मुख्याध्यापिकेने सहकार्य करण्याचे तर नाकारलेच; पण बस चालकाचीही पाठराखण केल्याचा तिच्या पालकांचा आरोप आहे.

पालक पोलिसात गेल्यावर तक्रार दाखल करून घेण्यात आली असून चालकाला अटक केली आहे. दोन वर्षांपूर्वी देखील असेच घडले होते. घटनेची जबाबदारी घेण्याचे संबंधित घटकांनी त्याहीवेळी नाकारले होते. त्यामुळे घटनेतील मुलींची नावे बदलली इतकाच काय तो बदल. न्यायासाठी पालकांनी आंदोलन करू नये म्हणून रेल्वे स्थानक परिसरात तातडीने बंदोबस्त लावला गेला. इतकी तातडी आणि संवेदनशीलता सरकारी यंत्रणेकडून इतरवेळी अनुभवास का येत नाही? घटना घडल्यावरच जाग का येते? वास्तविक, सरकारी व्यवस्था निर्मितीमागे जनकल्याण आणि सामाजिक सुरक्षितता हाच मुख्य हेतू असतो. पण त्या व्यवस्थांचा बेजबाबदार दृष्टिकोन आणि निष्काळजीपणा लोकांना नवा नाही. तसे असंख्य अनुभव आढळतात. आताही कारवाईचे घोडे वरातीमागूनच धावले आहे. तपासाअंती व्हॅन बेकायदा चालवली जात असल्याचे उघड झाले आहे.

यंत्रणेने गाडी जप्त केली आहे. त्याचा काय उपयोग? घटना घडलीच नसती तर बेकायदा वाहतूक सुरूच राहिली असती. पूर्वी घडलेल्या घटनेनंतर सरकारी विभागाने ढीगभर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. त्यात, शाळेच्या आवारात सीसीटीव्ही बसवणे आणि विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये विशेषतः बसमध्ये महिला सहकारी नेमणे या दोन सूचनांचा समावेश आहे. उपरोक्त घटनेतील वाहनात महिला सहकारी नव्हतीच. मार्गदर्शक सूचना जाहीर करून जबाबदारी पार पाडली म्हणून स्वतःची पाठ थोपटून यंत्रणा मोकळी झाली तर सूचनांची अंमलबजावणी करणार असल्याची कागदोपत्री कबुली देऊन शाळा व्यवस्थापन मोकळे झाले. पण त्या सूचनांचे पालन होते की नाही हे कोण तपासणार? सूचनांचे पालन करणे ही शाळा व्यवस्थापनाची तर त्यांना तसे पालन करायला भाग पाडणे ही सरकारी यंत्रणेची जबाबदारी आहे. ती ते पार पाडत नाहीत हेच या दुर्घटनेमुळे अधोरेखित होते.

या घटनेने मुलगी आणि तिच्या कुटुंबियांना धक्का बसणे स्वाभाविकच आहे. सगळेच पालक यामुळे अस्वस्थ झाले असतील. मुलगी वेळेत घरी आली नाही म्हणून पालक सक्रिय झाले. त्यांनी पोलिसात धाव घेतली आणि तक्रार नोंदवली ती बाब दखलपात्र आहेच, त्यांची संवेदनशीलता इतर पालकांसाठी अनुकरणीय ठरू शकेल. पण अशा घटना का घडतात याचा पालक देखील अंतर्मुख होऊन विचार करतील का? निर्धोक वातावरण निर्मिती आणि कायद्याचे पालन हे सरकारचे प्रमुख कर्तव्य आहेच. केवळ चालकाला अटक पुरेशी नाही. गुन्हा सिद्ध होऊन दोषींना शासन होईपर्यंत पाठपुरावा करणे हे सरकारचेच काम आहे. पण त्या बरोबरीने किती शाळा व्यवस्थापन, पालक अथवा त्यांच्या संघटना मार्गदर्शक सूचनांच्या बाबतीत जागरूक आढळतात? शाळा व्यवस्थापनावर अमलबजावणीसाठी किती पालकांच्या संघटना दबाव आणतात? विद्यार्थी वाहतुकीच्या गाडी चालकाची आणि वाहनांची कागदपत्रे तपासतात? किमान माहिती घेऊन ठेवतात? तशी दक्षता घेतली जात असती तर बेकायदा वाहन विद्यार्थी वाहतूक करूच शकले नसते. घटना घडली की तीव्र प्रतिक्रिया उमटतात. न्यायाच्या मागणीसाठी लोक रस्त्यावर उतरतात. सरकारही संतप्त वातावरण शांत होईल असे निर्णय तातडीने जाहीर करते. वातावरण शांत झाले की, घटना विस्मृतीत जाते. मागे उरतात त्या घाबरलेल्या-भेदरलेल्या मुली आणि तिच्या कुटुंबियांच्या वेदना व त्यांना बसलेला धक्का. तसे यावेळी घडू नये. अशा घटनांचे मुलींच्या मनावर होणारे कायमचे दुष्परिणाम हा चिंतेचा वेगळा विषय आहे. त्यावर देखील चिंतन आणि मंथन व्हायला हवे.

## पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची बैठक

जालना । प्रतिनिधी



**पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज २६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे दुपारी १.०० वाजता जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

यामध्ये दि. १४ जुन २०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. दि. १४ जुन २०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्द्यांचे अनुपालन अहवाल. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/ अनु. जाती उपयोजना/ओ.टी.एस.पी.) सन २०२५-२६ खर्चाचा आढावा घेणे.जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/ अनु. जाती उपयोजना/ओ.टी.एस.पी.) सन २०२६-२७ प्रारुप आराखड्यास मान्यता देणे.जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/ अनु. जाती उपयोजना/ओ.टी.एस.पी.) सन २०२५-२६ पुनर्विनियोजनास मान्यता देणे. अध्यक्ष महोदयांच्या मान्यतेने सुचविलेले ऐन वेळेचे विषय याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच बैठक संपल्यानंतर पालकमंत्री पत्रकार परिषद घेणार आहे. अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# किरकोळ वादातून १८ वर्षीय युवकाच्या पोटावर चाकूने वार करून हत्या

अंबड (प्रतिनिधी)

**अंबड तालुक्यातील पारनेर फाटा येथे १८ वर्षीय तरुणाची पोटात चाकू भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पवन संतोष बोराटे (वय १८) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी अंबड पोलिसांनी आरोपी राहुल खरे याला अटक केली.**

शनिवारी रात्रीच्या सुमारास पारनेर फाटा येथे पवन संतोष बोराटे (रा. पारनेर) आणि आरोपी राहुल उध्दव खरे (रा. पारनेर ता. अंबड) यांच्यात वाद झाला. हा वाद आरोपीच्या बहिणीला पवनने दिलेल्या एका चिठ्ठीवरून झाल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या वादाचे रूपांतर काही वेळातच हिंसक घटनेत झाले. रागाच्या भरात आरोपी राहुल खरे याने पवन बोराटे यास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर हत्या करण्याच्या



उद्देशाने आरोपीने पवनच्या पोटात चाकूने दोन गंभीर वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यात पवन गंभीर जखमी झाला. रक्तस्त्राव होत असल्याने परिसरातील नागरिकांनी त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच पवनचा दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच अंबड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुरले व पोलीस टीम घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला. या प्रकरणी मयत पवनचे वडील संतोष बबनराव बोराटे (वय ४५) यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी राहुल खरे याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांनी तात्काळ हालचाली करत संशयित आरोपी राहुल खरे यास ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीची कसून चौकशी सुरू असून, घटनेमागील नेमके कारण आणि इतर बाबींचा तपास पोलीस करत आहेत. हत्या प्रकरणी चार आरोपी असल्याचे चर्चा सुरू आहे.तसेच चार पैकी एक आरोपी गंभीर गुन्हेगार आहे असल्याचे पण बोलल्या जात आहे.



## तुम्ही सांगाल ते विकासकाम करू-भास्कर आबा दानवे

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पार्टीला दणदणीत विजय मिळाल्याबद्दल दत्त नगर, जालना येथे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशिला भास्करराव दानवे, सौ. पद्मा अजित मानधनी, सौ. ज्योती रवि सले व श्री. कल्याण भदनेकर यांचा नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. प्रतिक भैय्या दानवे तसेच प्रा. कपिल दहेकर, श्री. जागृती यादव, श्री. विनोद यादव, श्री. रवि सले, रावसाहेब जगताप, भगवानराव गुंजाळ आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी बोलताना नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, दत्त नगर परिसरात यापूर्वी ड्रेनेज लाईन, सिमेंट रस्ते व विद्युतीकरणासह विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. तरी उर्वरित राहिलेली विकासकामे कामे पुढील काळात पूर्ण केली जातील अशी ग्वाही देण्यात आली.

# २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन : संविधानाचा दीप, स्वातंत्र्याचा अर्थ आणि नागरिकत्वाचा अभिमान

**भारताच्या इतिहासात काही तारखा केवळ दिनदर्शिकेतील नोंदी नसतात ; त्या राष्ट्राच्या आत्म्यात कायमच्या कोरल्या जातात . २६ जानेवारी ही अशीच एक तारीख आहे . हा दिवस भारताने स्वतःला ओळख दिलेली , स्वतःचे शासनस्वरूप स्वीकारलेले आणि लोकसत्तेला घटनात्मक अधिष्ठान दिलेले आहे . प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ राष्ट्रीय सण नाही ; तो भारतीय लोकशाहीचा श्वास आहे , संविधानाचा उत्सव आहे आणि प्रत्येक नागरिकाच्या कर्तव्याची आठवण करून देणारा अभिमानाचा क्षण आहे .**

स्वातंत्र्य मिळवणे ही ऐतिहासिक घटना होती ; पण स्वातंत्र्याला दिशा देणे , नियम देणे आणि मूल्यांची चौकट देणे हे त्याहून मोठे कार्य होते . १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला , पण २६ जानेवारी १९५० रोजी भारत खऱ्या अर्थाने स्वशासित झाला . त्या दिवशी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारले आणि स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले . सत्ता राजा , सम्राट किंवा वारसाहक्काकडे न ठेवता , ती थेट जनतेकडे सुपूर्द करण्यात आली . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा सरकारचा नाही , तर नागरिकांचा सण आहे . २६ जानेवारी ही तारीख निवडण्यामागेही इतिहासाची खोल जाण आहे . २६ जानेवारी १९३० रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने लाहोर अधिवेशनात पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला होता . त्या दिवसापासून भारताने ब्रिटिश सत्तेखाली अर्धवट स्वातंत्र्य नाकारून संपूर्ण स्वराज्याचा संकल्प केला . म्हणूनच संविधान अंमलात आणण्यासाठी हाच दिवस निवडण्यात आला . हा निर्णय केवळ प्रशासकीय नव्हता ; तो स्वातंत्र्यलढ्याला दिलेला मान होता . भारतीय संविधान हे एका दिवसात तयार झालेले नाही . जवळपास तीन वर्षे चाललेल्या चर्चांमधून , वादविवादांतून , अनुभवांतून आणि त्यागातून ते जन्माला आले . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले हे संविधान केवळ कायद्यांचा संग्रह नाही ; ते सामाजिक करार आहे . समानता , स्वातंत्र्य , न्याय आणि बंधुता या चार मूल्यांवर भारतीय लोकशाही उभी आहे . बाबासाहेबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की संविधान कितीही चांगले असले , तरी ते अंमलात आणणारे लोक चांगले




नसतील , तर ते अपयशी ठरेल . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा आत्मपरीक्षणाचा दिवस आहे . भारतीय संविधान जगातील इतर संविधानांपेक्षा अनेक अर्थांनी वेगळे आहे . हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे . इतक्या विविध भाषा , धर्म , जाती , संस्कृती आणि भौगोलिक विषमता असलेल्या देशात एकसमान नागरिकत्व देणारे हे दुर्मीळ उदाहरण आहे . धर्मनिरपेक्षता , सामाजिक न्याय , आरक्षण , मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये यांचा समतोल साधणारे हे संविधान आहे . जिथे अनेक देशांत संविधान सत्तेचे रक्षण करते , तिथे भारतीय संविधान नागरिकाचे रक्षण करते . हीच त्याची खरी ताकद आहे . प्रजासत्ताक दिन साजरा करताना त्या असंख्य बलिदानांची आठवण होणे अपरिहार्य आहे . लोकमान्य टिळक , महात्मा गांधी , सुभाषचंद्र बोस , भगतसिंग , राजगुरू , सुखदेव , चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या असंख्य क्रांतिकारकांनी आपले आयुष्य देशासाठी अर्पण केले . त्यांच्या त्यागामुळेच संविधानातील प्रत्येक शब्दाला नैतिक अधिष्ठान लाभले . “ दे दी हमें आज़ादी बिना खड्ग बिना ढाल ” या ओळी आजही स्वातंत्र्याच्या मूल्यांची आठवण करून देतात . दिल्लीतील कर्तव्य पथावरील प्रजासत्ताक दिनाची परेड ही केवळ लष्करी शक्तीचे प्रदर्शन नाही . ती भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा , वैज्ञानिक प्रगतीचा आणि सामाजिक एकतेचा आरसा आहे . राज्यांचे चित्ररथ “ अनेकतेत एकता ” या संकल्पनेला दृश्य रूप देतात . मराठी गाण्यातील “ देश माझा रंगीला , संस्कृतीचा संगम झाला ” ही ओळ या दिवसाला अधिक अर्थपूर्ण बनवते . प्रजासत्ताक दिन आपल्याला अधिकारांची आठवण करून देतो ; पण त्याच वेळी कर्तव्यांचीही जाणीव करून देतो . मतदान करणे , कायदा पाळणे , सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे , सहिष्णुता जपणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे . मराठी म्हण आहे अधिकार मागायचे असतील , तर कर्तव्ये पाळावी लागतात . लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नाही ; ती सतत चालणारी जबाबदारी आहे . आजच्या काळात लोकशाहीसमोर नवी आव्हाने उभी आहेत . अफवा , द्वेष , असहिष्णुता आणि अर्धसत्य यामुळे लोकशाही कमजोर होऊ शकते . अशा वेळी संविधानातील मूल्ये अधिक घट्ट पकडणे गरजेचे आहे . लोकशाही टिकते ती भाषणांनी नाही ; ती टिकते कृतीतून , संयमातून आणि संवादातून . भारत हा तरुणांचा देश आहे . आजची तरुण पिढीच उद्याचा भारत घडवणार आहे . संविधान समजलेली , विवेकशील आणि जबाबदार तरुणाईच प्रजासत्ताक मजबूत करू शकते . “ ये देश है वीर जवानों का ” ही ओळ आजही तितकीच अर्थपूर्ण आहे . प्रजासत्ताक दिनाचा गर्व प्रत्येक भारतीयाला असावा , कारण हा देश आपला आहे , हे संविधान आपले आहे आणि ही लोकशाही आपली आहे . जगात अनेक देश स्वातंत्र्य मिळवतात ; पण फार थोडे देश लोकशाही टिकवतात . भारत हा त्यापैकी एक आहे . म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस केवळ ध्वजारोहणाचा क्षण नाही ; तो नागरिक म्हणून स्वतःकडे पाहण्याचा क्षण आहे . संविधान पुस्तकात नसते ; ते नागरिकांच्या आचरणात असते . आणि जेव्हा प्रत्येक नागरिक संविधान जगतो , तेव्हाच प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने जिवंत राहते .

**जय हिंद । जय संविधान ।**

**चंद्रकांत शेळके**
**तहसिलदार, बीड**

## पान १ वरून...

### २६९६ कोटी रुपयांच्या तूर

शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. या प्रक्रियेमुळे थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केली जाणार असून, व्यापाऱ्यांऐवजी मूळ उत्पादकांपर्यंत सरकारचा पैसा पोहोचणार आहे.

-------------

### खटला सुरू असताना सरन्यायधीशांना

मात्र राजकारणी तिथे स्वागताला गेले. ताज पॅलेसमध्ये ही भेट व्हावी म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बराच वेळ तिथे थांबले होते. न्यायमूर्ती सूर्यकांत तारीख पे तारीख देत आहेत आणि दुसरीकडे ज्यांचा खटला सुरू आहे त्यांच्याशीच गाठीभेटी घेत आहेत. जर हे असेच सुरू राहिले, तर न्यायव्यवस्थेवरचा उरलासुरला विश्वासही उडून जाईल. उशिराने मिळालेला न्याय म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच आहे; पण केवळ न्याय नाकारला जात नाही, तर अशाने न्यायाचा विनाश (किंवा अंत) होतो.‘‘ असे सूर्य कांत यांनी शनिवारी सांगितले. आम्ही तेच म्हणत आहोत. शिवसेना चिन्ह आणि पक्षाबाबत निर्णय अजून झाला नाही. न्यायमूर्ती सूर्य कांत यांना राजकारणात यायचे आहे, म्हणून हे सगळे करत आहेत, असा आरोपही राऊत यांनी केला. मराठी आणि महाराष्ट्र या मुद्द्यावर बोलताना पुढे संजय राऊत म्हणाले की, मुंबईत बिहार भवन बांधायचे आहे, तर सर्वपक्षीय बैठक घ्या. सर्वांना सांगा, मी मुंबईत बिहार भवनसाठी जागा देतो आणि पाटण्यामध्ये आम्हाला ५ एकर जागा द्या. आम्हालाही तिथे ३० माळ्यांची इमारत बांधायची आहे. ही सांस्कृतिक देवाणघेवाण आहे. मुंबईत जागा हवी असेल, तर गौतम अदानींकडून घ्या बाजारभावाने, असा टोलाही त्यांनी लगावला.भाजप नेते मंगलप्रभात लोढा यांच्यावर निशाणा साधताना राऊत म्हणाले की, ‘‘रुग्णालयांवरील ब्रिटिशकालीन नावे बदलण्याची भाषा केली जाते, पण लोढा यांच्या कंपनीने त्यांच्या प्रकल्पांना ट्रम्प टॉवर अशी परदेशी नावे दिली आहेत. महाराष्ट्र हा मराठी माणसाने आपल्या घामातून घडवला आहे, हे विसरू नका,‘‘ असा इशाराही त्यांनी दिला.

**मुंबईत बिहार भवन उभारायला जमीन पाटण्यावरून आणणार का?**

प्रत्येकाला देशांतर्गत फिरण्याचा, नोकरी करण्याचा अधिकार दिला आहे, हे आम्हालाही माहीत आहे. इतर राज्यांची भवने नवी मुंबईत उभारण्यात आली आहेत. हा देश सर्वांचा आहे; पण बिहारचे मंत्री अशोक चौधरी यांनी आव्हानाची भाषा केली. त्यांना आपली भाषा अधिक सौम्य करता आली असती. वातावरण खराब करू नका, असे आवाहन करत, मुंबईत बिहार भवन बांधण्यासाठी जमीन पाटण्यावरून आणणार का? असा सवाल संजय राऊत यांनी केला.

------------

### महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, श्रीरंग

आहे. मुंबईतील सायन रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता आणि ‘स्नेहा’ संस्थेच्या संस्थापिका डॉ. अर्मिडा फर्नांडिस यांना वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्यासाठी पद्मश्री जाहीर झाला आहे. आशियातील पहिली मानवी दुग्धपेढी स्थापन करण्याचे श्रेय त्यांना जाते. नवजात बालकांचा मृत्यूदर रोखण्यासाठी आणि झोपडपट्टी भागातील माता-बालकांच्या आरोग्यासाठी त्यांनी केलेले कार्य जागतिक स्तरावर नावाजले गेले आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील शेतकरी श्रीरंग लाड यांना कापूस संशोधनातील त्यांच्या नावीन्यपूर्ण प्रयोगांसाठी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोणत्याही मोठ्या पदव्या नसताना, केवळ अनुभवाच्या जोरावर त्यांनी कापसाच्या अशा वाणांचा शोध लावला, ज्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. त्यांच्या या कार्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठी उभारी मिळाली असून, एका सामान्य शेतकऱ्याचा हा गौरव कृषी क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला आहे. आदिवासी वारली संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या ‘तारपा’ वाद्याला जागतिक ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ कलाकार भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी ‘पद्मश्री’ पुरस्कार जाहीर झाला आहे. पालघरच्या वाळवंडे गावच्या या ९० वर्षीय कलाकाराने गेल्या १५० वर्षांची कौटुंबिक वादन परंपरा जिवंत ठेवली आहे. देशात नागरी पुरस्कार १९५४ मध्ये सुरू झाले. या ४ प्रकारच्या पुरस्कारांमध्ये भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री यांचा समावेश आहे. आम्ही देशातील चार नागरी सन्मानांबद्दल सांगत आहोत. या पुरस्कारांची घोषणा २६ जानेवारी रोजी केली जाते. पुरस्कार प्रदान समारंभ मार्च-एप्रिलमध्ये राष्ट्रपती भवनात होतो. या पुरस्कारांमध्ये पदक आणि सन्मान प्रमाणपत्र असते.

---------------

### एसटीची मदार कंत्राटी

५१५० भाडे तत्त्वावरवरील इलेक्ट्रिक बसेसपैकी ५५९ बस ताफ्यात दाखल झाल्या असून येत्या काही वर्षात अजून काही गाड्या टप्प्याटप्प्याने दाखल होतील. इलेक्ट्रिक बसेस या भाडे तत्त्वावरवरील असल्यातरी त्यावर चालक खासगी कंपनीचा असला तरी वाहक व अन्य कर्मचारी कायम सेवेतील लागणार आहेत. नव्या गाड्या येत असल्या तरी मनुष्यबळाचा प्रचंड तुटवडा हे मोठे आव्हान आहे. सध्या शासनाने १६५०० चालक व ११०० यांत्रिकी कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरती करण्यास परवानगी दिली आहे. हे कंत्राट कर्मचारी तीन वर्षांसाठी आहेत. भविष्यातील धोके पाहता शासनाने कायम स्वरूपी कर्मचारी भरती करण्यास मंजुरी देण्याची मागणी एसटीतील कामगार संघटनांनी केली आहे. चालक हा सर्वात महत्त्वाचा घटक असून २८,२५७ चालकांची मंजुरी असताना एसटीमध्ये सध्या २१५१० चालक आहेत.२७,४१३ वाहकांची मंजुरी दिली असताना सध्या २३,६८३ वाहक आहेत. सध्या सुरू असलेल्या फेऱ्यांचा विचार केला तर कर्मचाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. यामुळे चालक-वाहकांवर दाब, डबल ड्युटी, आणि सेवांची गुणवत्ता घटण्याचा धोका कायम आहे. सध्या एसटीत चलनात असलेल्या स्वमालकीच्या १५०८५ गाड्यांवर चालक व वाहक यांची संख्या कमी पडत आहे.

**भरतीची घोषणा मात्र पुढे काहीच नाही**

सरकारने २००४ मध्ये २१,३५३ कायम स्वरुपी प्रशासकीय कर्मचारी असावेत अशी मंजुरी दिली होती. पण प्रत्यक्षात मात्र १२,७०९ इतकेच कर्मचारी आहेत. त्याच मंजुरीमध्ये २७,०७४ कार्यशाळा कर्मचारी असावेत अशी मंजुरी दिली असताना प्रत्यक्षात मात्र फक्त १५,५९१ कर्मचारी आहेत. भरती करणार असल्याचे नुसतेच जाहीर केले मात्र अद्याप काहीच झाले नाही.

--------------

### मतदार हे लोकशाहीचा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी २०२६ च्या पहिल्या ‘‘मन की बात’’ कार्यक्रमात देशाला संदेश दिला. पंतप्रधान मोदी यांनी, हा २०२६ च्या वर्षातील पहिला ‘‘मन की बात’’आहे. २६ जानेवारी रोजी आपण प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत. या दिवशी आपले संविधान लागू झाले. हा दिवस आपल्या संविधानाच्या संस्थापकांना आदरांजली वाहण्याची संधी आपल्याला देतो असे त्यांनी म्हटले. नद्यांबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, उत्तर प्रदेशातील आझमगडमधून वाहणाऱ्या तामसा नदीला लोकांनी नवीन जीवन दिले आहे. अयोध्येत उगम पावणारी आणि गंगेत विलीन होणारी ही नदी एकेकाळी या प्रदेशातील लोकांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होती. मात्र, प्रदूषणामुळे तिचा अखंड प्रवाह विस्कळीत झाला होता. त्यानंतर, स्थानिकांनी तिचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मोहीम सुरू केली. नदी स्वच्छ करण्यात आली. तिच्या काठावर सावलीदार आणि फळे देणारी झाडे लावण्यात आली. स्थानिक लोक कर्तव्याच्या भावनेने या कामात सहभागी झाले आणि सर्वांच्या प्रयत्नातून नदीचे पुनरुज्जीवन झाले.

------------

### मुंब्रा टू महाराष्ट्र : कैसा

याच एमआयएम पक्षाकडून पहिल्यांदाच विजयी झालेली सहर शेख हिने विजयानंतर आपला आनंद व्यक्त करताना, आमदार जितेंद्र आव्हाड यांना खुले चॅलेंज केले. भाषणात त्यांनी कैसा हराया हा डायलॉग मारला, त्याची चर्चा राज्यभर झाली. कैसा हराया इथपर्यंतच ही चर्चा थांबली नाही तर भविष्यामध्ये मुंब्रा हिरवा करू, असे ओपन चॅलेंज आव्हाड आणि इतर पक्षांना दिले. त्यानंतर सहरचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला. मग राजकारण्यांनी त्यांच्या मतानुसार त्या व्हिडिओवर प्रतिक्रिया सुरू केल्या. आता त्यात भर म्हणून एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी मुंबईत हजेरी लावली आणि कैसा हराया या पुढचा अध्याय त्यांनी मांडला. तो आता केवळ मुंब्राच नाहीतर महाराष्ट्र हारा करेंगे असे वक्तव्य केले आणि नव्या वादाला तोंड फोडले. एमआयएमचा पक्ष आणि झेंडा रंग हिरवा असल्यामुळे कदाचित शेख सहर किंवा इम्तियाज जलील हरा करेंगे असे म्हणाले असावेत. परंतु त्यानंतर अनेकांचे हिंदुत्व जागे झाले. कोणी म्हणाले, हिरवा करायचा असेल तर पाकिस्तानात जावा लागेल. कोणी म्हणाले मुंब्रा काय पाकिस्तान आहे का. पण एमआयएमच्या नूतन नगरसेविका कोणत्या भावनेतून बोलल्या हे सांगता येणार नसले तरी त्यांनी मात्र खुलासा करताना आपल्या पक्षाचा झेंडा हिरवा असल्याचे नमूद केले. पोलिसांनी दिलेल्या नोटिसी नंतर माफीनामाही पोलिसांना दिला मात्र त्यानंतर इम्तियाज जलील यांनी या राजकीय रंगात पुन्हा तेल ओतण्याचे काम केले, भाजप, शिवसेना व इतर पक्ष सत्ता आल्यानंतर भगवा फडकला असे वक्तव्य करत असतील तर एमआयएमने हिरवा फडकला असे म्हटले तर त्यात वावगे काय असा प्रश्न राष्ट्रवादी विचाराच्या नागरिकांना पडला असावा. त्यांची भावना मुस्लिम धर्म आहे की नाही ही माहित नाही, परंतु याची चर्चा मात्र राज्यभर झाली. कारण एमआयएमकडे मुस्लिमांचा पक्ष म्हणूनच पाहिले जाते. कदाचित त्यामुळेच हा राजकीय रंग जातीय रंगात मिसळला गेला असावा. आजही महाराष्ट्रात हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील बंधुभाव एकात्मता दिसत आहे. असे असताना अशा वक्तव्यानंतर भविष्यात अशा पद्धतीने राजकीय पक्ष आगामी निवडणुकीला सामोरे गेले तर मतदानासाठी पुन्हा धार्मिक समीकरणे जोडली जातील यात शंका नाही.

-----------

### देशातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या

उपजीविका देखील धोक्यात आली आहे. विशेषतः बांधकाम मजूर आणि हातावर पोट असलेल्या दैनंदिन मजुरांच्या कामावर याचा विपरीत परिणाम होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. दरवर्षी हिवाळा संपला की प्रदूषणाचा प्रश्न विसरला जातो, या प्रवृत्तीवरही त्यांनी बोट ठेवले. ही समस्या केवळ पुढच्या हिवाळ्यापर्यंत विसरून चालणार नाही. बदलासाठी पहिले पाऊल म्हणजे आपला आवाज बुलंद करणे हे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात राहुल गांधी यांनी नागरिकांना त्यांच्या समस्या आणि अनुभव मांडण्यासाठी आवाज भारताची या संकेतस्थळाचा दुवा शेअर केला असून, लोकांच्या समस्या संसदेत मांडणे हे आपले कर्तव्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

-----------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २६ जानेवारी २०२६



## थोडक्यात




### मोठेवाडीत मोफत नेत्र तपासणी शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे आय. डी. एफ. सी. बँक व मुंदडा नेत्र रूग्णालय संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ जानेवारी बुधवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

या शिबिरात डॉ.योगेश बादले, डॉ.धनंजय शिंदे यांनी २१५ महिला व पुरूष रूग्णांची मोफत नेत्र तपासणी केली. हे शिबीर यशस्वी होण्यासाठी आय.डी.एफ.सी. बँकेचे शरद देढे, गणेश वराडे गावातील वसंत पास्टे, जयराम रासवे, दिपक पास्टे, माऊली वराडे, सुनील खटले, सचिन रोकडे यांच्या सह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

### ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये ट्रॅडिशनल डे उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे दि. २३ जानेवारी २०२६ रोजी ट्रॅडिशनल डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थी साडी, धोतर, कुर्ता-पायजमा तसेच भारतातील विविध राज्यांच्या पारंपरिक पोशाखात सजले होते. रंगीबेरंगी वेशभूषेमुळे संपूर्ण महाविद्यालयीन परिसर सांस्कृतिक वातावरणाने नटून गेला होता. कार्यक्रमादरम्यान पारंपरिक नृत्ये, गीत सादरीकरण व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या प्राचार्य वेळापुरे सर व शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक करत भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ट्रॅडिशनल डे निमित्ताने विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख जपण्याची व आनंदाने साजरा करण्याची संधी मिळाली.



### जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शालेय क्रीडा स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शालेय क्रीडा स्पर्धाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंम्पे व लक्ष्मण राऊत क्रीडा शिक्षक श्री आनंद वाघमारे, प्रशांत वायभट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेमुळे आरोग्य शिस्त व यश मिळते, क्रीडा विषयी जाणीव शारीरिक तंदुरुस्ती वाढावी या उद्देशाने शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, पहिली ते दहावी च्या विद्यार्थ्यांन साठी आयोजित करण्यात आले, मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते, या मध्ये गोळा फेक, थाळी फेक, धावणे, क्रिकेट, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, पोत्यात धावणे, इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री सुभाष काकड, विजय कोळेकर, विनायक तोताडे, भागवत नाडे, योगानंद गांधले,संतोष परतापुरे, उद्धव घोडके, वैभव शिंदे, ज्ञानेश्वर मस्के, रामचंद्र भोसले, सुग्रीव तांदळे,अमोल ढास, ज्येष्ठ शिक्षिका शालिनी काकडे, शकुंतला तांबडे, उषा माने, मोहर जोगदंड, अलका गुजर, माधुरी इनकर, या सर्व शिक्षकांचे शालेय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान लाभले.

# धसपिंपळगाव येथे सोलार प्लांटवर शस्त्राचा धाक दाखवून सहा लाखाची लुट

पाटोदा । । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धसपिंपळगाव शिवारात एका सोलार प्लांटवर सशस्त्र दरोडा पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चोरट्यांनी सुरक्षा रक्षकांना शस्त्राचा धाक दाखवून आणि बेदम मारहाण करत सुमारे ३ लाख रुपये किमतीचे ६ किलोमीटर लांबीचे तांब्याचे केबल चोरून नेले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**शस्त्राचा धाक आणि मारहाण**

मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर कासार तालुक्यातील हाटकरवाडी येथील



रहिवासी राजेंद्र बाबासाहेब सदगर हे धसपिंपळगाव येथील सोलार प्लांटवर खासगी सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. २३ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास राजेंद्र सदगर आणि त्यांचे सहकारी मल्हारी भंडगर हे कर्तव्यावर असताना आरोपी हेमंत नाना काळे, राहुल मच्छिंद्र शिंदे, रमेश विलास पवार, दिलीप विलास पवार आणि इतर दोन अनोळखी इसम तेथे आले. आरोपींनी कोयता आणि सुऱ्याचा धाक दाखवून दोन्ही सुरक्षा रक्षकांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

**लाखो रुपयांच्या केबलची चोरी**

दहशत निर्माण केल्यानंतर चोरट्यांनी सोलार पॅनलचे अंदाजे ६ किलोमीटर लांबीचे डीसी तांब्याचे केबल जबरदस्तीने कापून चोरून नेले. या चोरीच्या मालाची किंमत सुमारे ३ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

या हल्ल्यात राजेंद्र सदगर आणि मल्हारी भंडगर हे दोघेही जखमी झाले आहेत.

पोलिसांकडून तपासासाठी पथके रवाना : घटनेनंतर राजेंद्र सदगर यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२) आणि ३५१(३) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, फरार आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी विविध पथके रवाना केली आहेत.

## दिंद्रुड सज्जातील दोन पाणंद रस्त्यांचा श्वास मोकळा

**मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेचा लाभ देणार: संतोष रुईकर**

दिंद्रुड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजने अंतर्गत शेतकऱ्यांसाठीची नवीन योजना महाराष्ट्र शासनाने नुकतीच लागू केली आहे. या पार्श्वभूमीवर माजलगाव तहसीलदार संतोष रुईकर यांनी दिंद्रुड सज्जात शनिवारी भेट देत दोन पाणंद रस्त्याचा श्वास मोकळा करत पक्क्या रस्त्यासाठी प्रस्ताव शासना पुढे मांडला आहे.

बाबळगाव, दिंद्रुड ते कौस्तुभ कुलकर्णी व इसाक पटेल यांच्या गट नंबर ७२७, ७१८ व ७१७ या गटांमधून बांधाच्या रस्त्यात अनिल रंगनाथ पारेकर यांच्या शेतापर्यंत जवळपास एक किमी अंतराचा पाणंद रस्ता मोकळा करून शासनाकडे पक्का रस्ता करण्यासाठी अहवाल पाठवला आहे. चोपनवाडी ते दिंद्रुड या पाणंद रस्त्यावरील गट नंबर ४७७ व ४७८ च्या मध्य नंबर बांधावरून गट नंबर ४५१ असा जवळपास ७०० मीटर पानंद रस्ता मोकळा केला. संबंधित दोन्ही पाणंद रस्त्याचा अहवाल शासन दरबारी पाठवून लवकरात लवकर पक्का रस्ता बनवण्यात येणार असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांना तहसीलदार रुईकर यांनी सांगितले. यावेळी नायब तहसीलदार परमेश्वर चाफाकानडे, ग्राम महसूल अधिकारी प्रमोद चव्हाण, सरपंच कमलबाई सुरवसे, महसूल सेवक माऊली नरवटे, ग्राम रोजगार सेवक बाबासाहेब देशमाने, पत्रकार श्रीराम तांबे, बाबासाहेब सुरवसे सह शेतकरी अनिल पारेकर, एकनाथ तांबे उपस्थित होते.



> मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना ही महाराष्ट्र शासनाची नवीन योजना आहे, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतापर्यंत पक्के, बारमाही रस्ते बनवले जाणार आहेत. शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतूक सोपी होईल आणि पेरणी, मशागत व कापणी सुलभ होईल. बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अप्पर जिल्हाधिकारी आश्विनी जिरंगे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव तालुक्यातील सर्व प्रस्तावित पानंद रस्त्याचे कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याचा मानस आहे.
> -संतोष रूईकर, तहसीलदार, माजलगाव

## प्रजासत्ताक दिनी ५ हजार विद्यार्थ्यांचे सामूहिक संगीत कवायत सादरीकरण

बीड । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय व सर्व तहसील कार्यालयांच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण विभागाच्या पुढाकाराने संपूर्ण जिल्ह्यात संगीत कवायतींचे सादरीकरण होणार असून बीड शहरातील पोलिस परेड ग्राउंड येथे होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

या कार्यक्रमास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच जिल्हाधिकारीविवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची उपस्थिती लाभणार आहे. सदर कार्यक्रमात बीड शहरातील नामांकित शाळांमधील इयत्ता सातवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकडून संगीत कवायतींचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये शासकीय व खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा समावेश असून सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत देशभक्तीपर गीत, सरस्वती गीत तसेच लेझीम पथकांचे सादरीकरण होणार आहे.

शिक्षण विभागाकडून मागील १५ दिवसांपासून विद्यार्थ्यांना संगीत कवायतींचा सराव करून घेण्यात आला असून महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून निवडलेल्या देशभक्तीपर गीतांवर हे सादरीकरण साकारले जाणार आहे. राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव व संविधानाबद्दलची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून शहर व तालुका स्तरावरही एकत्रित कवायत सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गावातील शाळांनी एकाच मैदानावर एकत्र येऊन संगीत कवायत सादर करावी, असे नियोजन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाला राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक



माजलगाव । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १८ जानेवारी उदगीर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ १९ वर्ष वयोगटातून राज्यात तृतीय आला आहे, या स्पर्धेमध्ये छ. संभाजीनगर विभागाचा पहिला सामना नागपूर विभागाशी झाला, अगदी सरळ २-० ने हा सामना जिंकून सेमीफायनल चा सामना कोल्हापूर च्या संघाशी चूर्षीचा २-१ असा झाला , व तृतीय क्रमांकाचा सामना लातूर विभागाशी झाला लातूर विभागाला सहज पराभव करून २-० ने विजय मिळवून, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा संघ कांस्य पदकाचा मानकरी ठरला.

या संघामध्ये सहभागी खेळाडू कर्णधार वैष्णवी कोरडे, आदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, गौरी गायकवाड या मुलींचा सहभाग होता,विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश भाऊ चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक , प्रा. संजय बागुल, प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. इम्रान पठाण प्रा. डॉ. एकनाथ शेंडगे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून स्वयंसेवकांनी व्यक्तिमत्व घडवावे-डॉ. सचिन कळलावे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेतून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास होतो. त्यामुळे प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनातील भीती दूर होणे आवश्यक आहे. मनातील विचार निर्भयपणे व्यक्त करून स्वतःला सिद्ध करण्याचे कार्य रासेयोजनेतून होते असे मत डॉ. सचिन कळलावे यांनी मौजे अंजनडोह येथे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या रासेयोजनेच्या विशेष वार्षिक शिबिराच्या समारोप प्रसंगी स्वयंसेवकांशी संवाद साधताना म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपतून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधताना सांगितले की, रासेयोजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्राम जीवन, श्रम मूल्य यांची ओळख करून देते. प्रामुख्याने पाणी प्रश्न, पाण्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी गावामध्ये जागृती घडवितो. गावातील ग्रामस्थांना सर सेवकांनी दिलेला संदेश घेऊन ग्रामसंपन्नतेसाठी प्रयत्न करावेत असे सांगितले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. याप्रसंगी रमेश सुर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. स्वयंसेवक अमन बेग, वैष्णवी साळवे, राहुल रेपे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाधिकारी डॉ. डी.



बी. जाधव यांनी शिबिराच्या माध्यमातुन केलेल्या कामाचा आढावा सांगितला. शिबिर प्रसंगी सरपंच श्री. प्रमोद सोळंके, उपसरपंच श्री. प्रकाश सोळंके, सुधीर सोळंके, रामदास कांबळे, चिदंबर गायकवाड, माधव गवरकर, रावसाहेब देशमुख, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पत्रकार अविनाश जगताप, राहुल माटे, जितेंद्र पवार, चांद भाई, माने मावशी, तोरण मावशी यांची उपस्थिती होती. रासेयोजनेच्या स्वयंसेवकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी तर आभार डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### ध्वजारोहण कार्यक्रमास

स्पुलिंग पेटविते. यावेळीही प्रजासत्ताक दिनानिमित्त सुद्धा बीड शहरातील बशीरगंज भागात असलेल्या पक्षाच्या मुख्य कार्यालयात पक्षाचे मा जिल्हाध्यक्ष ड शेख शफिक भाऊ यांच्या शुभहस्ते दिनांक २६ जानेवारी २०२६ शुक्रवार रोजी सकाळी १०.०० वाजता ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यात येईल. याकरिता बीड शहर आणि तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सकाळी १०.०० वाजताच पक्षाच्या मुख्य कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात ध्वजारोहण करावे. असे आवाहन पक्षाचे मा बीड शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर व युवा नेते शेख मुदस्सीर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

### इंदापूर येथे झाले कृषीमंत्री

मतदारसंघाचे माजी आमदार व शेतकऱ्यांचे नेते भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून यावर्षी तिसरे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आष्टी येथे संपन्न होत आहे. कृषी विकासातून समृध्दीकडे, एक पाऊल आधुनिक शेतीकडे ही संकल्पना घेऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यापुर्वीही दोन वेळा भव्यदिव्य असे प्रदर्शन आष्टी येथे झाले होते. ग्रामीण भागातील सर्वच शेतकऱ्यांना पुणे, नाशिक, बारामती अशा ठिकाणी दुरवर होणाऱ्या प्रदर्शनासाठी जाणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची जाण असलेले नेते म्हणून ओळख असलेल्या माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी सारख्या ग्रामीण भागात या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

### शिवसेनाप्रमुखांचे धगधगते

नंदुभाऊ येवले, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सहसचिव संदिप भानप, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, सर्कलप्रमुख विनोद गुंड पाटील, घुमरे पाटील, रत्नाकर येवले,बाबु कुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच बीड शहरातील जिव्हाळा बेघर केंद्रातील गोरगरीब व अनाथ लोकांना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी गोड जेवण दिले. संपूर्ण बीड तालुक्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांनी आप आपल्या गावात व विभागात जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

### माजलगावात वसंत

अनिता मुंदडा, सहसचिव सुगना तेला,कोषाध्यक्ष सुरेखा जेथलिया, सह कोषाध्यक्ष किरण कासट, संघटन मंत्री रत्नमाला इंदानी यांच्या उपस्थित घेण्यात आला या कार्यक्रमासाठी राजकवर भुतडा व गोदावरी लड्डा या उपस्थित होत्या लहान मुलांना सरस्वती व वाणीची देवता यांचे महत्त्व व वही पुस्तकाचे पूजन करण्यात आले लहान मुलांसाठी खेळ घेण्यात आले मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या या कार्यक्रमांमध्ये आशा मानधने व दीपा कासट यांच्या सह माहेश्वरी महिलाची उपस्थित लक्षणीय होती.

### डॉ.संतोष वनगुजरे यांची

हंबर्डे सचिव श्री अतुल काका मेहेर डॉ.गणेशजी पिसाळ साहेब श्री दिलीप शेठ वर्धमाने काका डॉ.गायकवाड साहेब प्रा. महेश चवरे श्री सुभान शेठ सर्व सन्माननीय संचालक मंडळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे सर उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे सर प्रा. अविनाश कंदले सर कार्यालयीन अधीक्षिका श्रीमती जाधव मॅडम सर्व प्राध्यापक बंधू शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

### मोठेवाडीत हरिनाम सप्ताह

जोशी हे देवी भागवत कथेचे निरूपण करत आहेत. त्यांना तबला साथ दत्ता महाराज बेद्रे, गायन साथ लक्ष्मण महाराज पांचाळ, हे करत आहेत.सायं ६:०० ते ७:०० हरिपाठ व रात्री ९:०० ते ११:०० हरिकीर्तनाचा कार्यक्रम व नंतर जागर होत आहे. हरिकिर्तनाला मृदंग साथ राम महाराज गायकवाड,शुभम महाराज गायकवाड व गायन साथ गणेश म.वाघमारे, कारभारी म.लाडाणे,उत्तम म.चोथे,पांडुरंग महाराज बांदल हे करत आहेत.दि.३१ जानेवारी रोजी सकाळी ०७:०० ते ९:०० ग्रंथ दिंडी सोहळा,सकाळी १०:०० ते दुपारी १:०० श्री. ह.भ.प.सिताराम महाराज रोडगे यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.तरी संपन्न होत असलेल्या धार्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन मोठेवाडी येथील समस्त,ग्रामस्थांनी केले आहे.

## अपघातग्रस्त तरुणाला वेळेत मदत करणाऱ्या ढाकणे दाम्पत्याचा बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सत्कार

बीड । प्रतिनिधी

मौजे जोला (ता. केज) येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई बाजीराव ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी अपघातग्रस्त तरुणाला वेळेत मदत करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. त्यांनी धिरज भवर (रा. हरीनारायण आष्टा, ता. आष्टी) या तरुणास १०८ रुग्णवाहिकेतून बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या उल्लेखनीय कार्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक आदरणीय प्राचार्य डी. जी. तांदळे सर यांनी सौ आशाताई ढाकणे व बाजीराव ढाकणे दाम्पत्याचा सत्कार करून विशेष कौतुक केले.




केज-बीड रस्त्यावर अपघात झाल्यानंतर जखमी तरुणाला तातडीने उपचार मिळणे गरजेचे होते. अशा स्थितीत सौ. आशाताई ढाकणे व बाजीराव ढाकणे यांनी क्षणाचाही विलंब न करता १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. जखमी तरुणास त्वरित रुग्णवाहिकेतून बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्याच्यावर तातडीचे उपचार सुरू होऊ शकले. वेळेत मदत मिळाल्याने पुढील उपचाराची प्रक्रिया सुलभ झाली, असेही सांगण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य डी. जी. तांदळे सर यांनी ढाकणे दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक करताना, अपघात किंवा संकटाच्या वेळी मदतीला धावून जाणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा माणुसकीच्या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो, असे गौरवोद्गार काढले. तसेच नागरिकांनी अपघातस्थळी फक्त गर्दी न करता जखमींना तातडीने मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.ढाकणे दाम्पत्यानेही गरजूला मदत करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. अपघातस्थळी मदतीला धावून गेल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात, अशी भावना व्यक्त केली. या सत्कारामुळे प्रेरणा मिळाली असून नागरिकांनी भविष्यातही कोठेही अपघात झालेला असल्यास क्षणाचाही विलंब न करता अपघातग्रस्तांना मदत केली पाहिजे असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. तसेच आपण करत असलेलं सामाजिक कार्य म्हणजे संकटात सापडलेल्या माणसाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणे हेच असते ते काम निरंतर चालू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे बीड शहराध्यक्ष तथा उद्योजक परवेझ कुरेशी, नगरसेवक झक्कीउदिन मोमिन, किसान सभेचे सरचिटणीस ज्योतीराम हुरकुडे, सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे, डॉ साक्षी जोगदंड, ॲड अनिल बारगजे, ॲड नितीन वाघमारे, बीड शहर बचाव मंचाचे नितीन जायभाये, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष फौजी अशोकराव येडे, साप्ताहिक संघर्षयात्रा चे संपादक आत्माराम वाव्हळ, पत्रकार संजय कुलकर्णी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस भाऊराव प्रभाळे, डोळस, इत्यादी मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

## युसूफवडगांव विद्यालयाचे इंटरनॅशनल मॅथ ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसुफवडगांव माध्यमिक विद्यालया मधील विद्यार्थ्यांनी सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथ ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेमध्ये उज्वल यश मिळवले आहे.




यामध्ये इयत्ता सहावी मधून प्रथम कु. लामतुरे अनुष्का श्याम,सातवी मधून प्रथम चि.नागरगोजे कानिफनाथ अंगद,नववी मधून प्रथम चि.खरबड शंतनु शिवानंद,दहावी मधून प्रथम चि.सावंत श्रीराम रमेश,द्वितीय चि.शेंडगे यश संपत,तृतीय कु.बरकसे अक्षदा हनुमंत,तर बारावी विज्ञान मधून प्रथम कु.शिंदे दिशा गोविंद यांनी क्रमांक पटकावले असून त्यांना नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत गोल्ड मेडल व अप्रिसिएशन प्रमाणपत्र मिळणार आहे आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव श्री.दीपक घुमरे,संस्थाअध्यक्ष श्री.सुकाळे यु.बी,प्राचार्य श्री.भोसले ए.यु,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख श्री.चव्हाण एन.एन,विद्यालयाचे श्री.प्रदीप घुमरे व प्राध्यापक,शिक्षक,असंख्य नागरिक आणि पालकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ऑनलाईन नोंदणीशिवाय तुरीची हमीभाव खरेदी नाही

## शेतकऱ्यांना नोंदणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

पुणे : तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. शासनाने तुरीच्या हमीभाव खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी अनिवार्य केली असून, नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांची तूर खरेदी केली जाणार नाही. हमीभावाने तूर विक्री करायची असल्यास शेतकऱ्यांना २० फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावी लागणार आहे. नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांची तूर हमीभाव केंद्रावर खरेदी केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मार्केटिंग फेडरेशन आणि विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून तुरीची खरेदी केली जाणार असून, त्यासाठी खरेदी केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. सन २०२५-२६ या खरीप हंगामातील तूर सध्या काढणीच्या टप्प्यात असून येत्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात बाजारात आवक होण्याची शक्यता आहे. सर्व केंद्रांसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करण्याचे





आवाहन करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणीसंदर्भातील पत्र व्यवहार पूर्ण करण्यात आला असून, नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. शेतकऱ्यांना तुरीची नोंदणी करण्यासाठी सेतू केंद्रावरून किंवा स्वतःच्या मोबाईलवरून (सेल्फ नोंदणी) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी शेतकऱ्यांकडे सातबारा उतारा आणि आधार कार्ड असणे आवश्यक आहे. नोंदणी झाल्यानंतरच हमीभाव केंद्रावर तूर विक्री करता येणार आहे. शासनाकडून तुरीसाठी ८ हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव देण्यात येणार आहे. सध्या खुल्या बाजारात तुरीला ७ ते साडेसात हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने भविष्यात दर घसरू नयेत, या खबरदारीने अनेक शेतकरी आधीच हमीभाव केंद्रावर नोंदणी करत आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसांत ऑनलाईन नोंदणीसाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

शेतकऱ्यांना वेळेत नोंदणीचे आवाहन

हमीभावाचा लाभ घ्यायचा असल्यास २० फेब्रुवारीपूर्वी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य असल्याने शेतकऱ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन संबंधित यंत्रणांसह कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# पॉलीहाऊस वापरण्याची पद्धत आणि त्याचे फायदे



पॉलीहाऊस म्हणजे लोखंड आणि प्लॅस्टिकच्या थरांनी बनलेली एक सीमा भिंत आहे, जी कीटक, रोग आणि हवामानापासून पिकांचे संरक्षण करते. एकदा लोखंडापासून बनवलेल्या पॉलीहाऊसची रचना सुमारे ८-१० वर्षे चालवता येते. पण कालांतराने प्लॅस्टिकचा थर खराब होतो, त्यामुळे दोन वर्षांनी तो बदलावा लागतो. मात्र, मिळालेल्या उत्पन्नातून त्याचा खर्च वसूल केला जातो. पॉलीहाऊसमध्ये शेती करून शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळतात. या तंत्राद्वारे शेतकरी प्लॅस्टिकच्या रचनेत हंगामी भाजीपाला सहज पिकवू शकतात. विशेषत: ज्या शेतकऱ्यांकडे लागवडीयोग्य जमिनीची कमतरता आहे, ते पॉलीहाऊसमध्ये भाजीपाल्याची आधुनिक शेती करून चांगला नफा कमवू शकतात. यामुळे मोकळ्या जागेचा उपयोग तर होईलच, पण चांगल्या उत्पन्नामुळे शहरांकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांचे स्थलांतरही थांबू शकेल.

वापरण्याची पद्धत : पॉलीहाऊस हे शेतीचे अतिशय प्रभावी आणि सोपे तंत्र आहे. स्वत: कृषी विभागाचे तज्ज्ञ व अधिकारी शेतकऱ्यांना लागवडीसाठी मदत करतात. माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की, पॉलीहाऊस जमिनीपासून थोड्या उंचीवर वर करून बांधले जातात, जेणेकरून सुरक्षित संरचनेत पाणी भरू नये आणि कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये. कृषी तज्ज्ञांच्या मते, पॉलीहाऊसचे पडदे सकाळी काही वेळ उघडावेत, यामुळे पिकाला निसर्गाचा स्पर्श मिळतो. पॉलीहाऊसची रचना बाजारपेठेच्या जवळच्या भागात आणि रहदारीची उपलब्धता असलेल्या ठिकाणी बसवावी. पॉलीहाऊसमध्ये फक्त त्या भाज्या, फळे आणि फुले पिकवली जातात ज्यांना जवळच्या बाजारपेठेत मागणी आहे हे लक्षात ठेवा. यामुळे चांगला नफा मिळविण्यात खूप मदत होते.

पॉलीहाऊसचे फायदे : कमी जमिनीतून अधिक नफा मिळविण्यासाठी पॉलिहाऊस तंत्रज्ञानाचा वापर खूप प्रभावी ठरतो. त्याचा सर्वात मोठा फायदा असा आहे की या रचनेत शेतकरी देशी-विदेशी आणि हंगामी आणि हंगामी पिके अतिशय कमी खर्चात घेऊ शकतात.पॉलीहाऊसमधील शेतीसाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केला जातो, ज्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. पॉलीहाऊसची रचना ही एक बंद रचना आहे, ज्यामध्ये कीटक येण्याची शक्यता कमी असते, यामुळे कीटकनाशकांच्या वापरावरही बचत होते. संरक्षित शेतीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यामध्ये रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो. पॉलीहाऊसमध्ये शेती केल्याने अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, उष्णता, जोरदार वारा, वादळ यांचा विशेष परिणाम होत नाही आणि पीक सुरक्षित राहते.

# उन्हाळ्यापासून फळबागांचे संरक्षण; क्रॉप कव्हर शेतकऱ्यांसाठी वरदान

काही दिवसांत उन्हाळ्याला सुरुवात होणार असून, हवामानातील बदलांमुळे उन्हाची तीव्रताही दरवर्षी वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत फळबागांचे योग्य संरक्षण व देखभाल करणे फार महत्त्वाचे ठरते. यासाठी अनेक भागांत क्रॉप कव्हर म्हणजे आच्छादन वापरले जाते. यामुळे बागेतील तापमान व आर्द्रता नियंत्रित राहते, पिकांना उष्णतेचा ताण कमी बसतो आणि फळांचे नुकसान टाळून दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते.



फायदे : क्रॉप कव्हर झाडाभोवती एक सुरक्षित कवच तयार करते, ज्यामुळे मिनी ग्रीन हाउस इफेक्ट झाडांना मिळतो. क्रॉप कव्हरचा वापर केल्याने पिकांना अनेक प्रकारे संरक्षण मिळते. उन्हाळ्यात तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाले की पिकांना उन्हाचे चटके म्हणजे सनबर्न होते. मात्र क्रॉप कव्हरमुळे ही तीव्रता कमी होते आणि झाडे सुरक्षित राहतात. तसेच मावा, पांढरी माशी, फुलकिडे, पक्षी व इतर हानिकारक किडींचा प्रादुर्भाव कमी होतो, त्यामुळे कीटकनाशकांचा वापर आणि खर्च दोन्ही ४० ते ५० टक्क्यांनी कमी होतात. झाडाची प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया सुधारते, ज्यामुळे झाड हिरवेगार राहते आणि फळांची सेटिंग चांगली होते. क्रॉप कव्हरमुळे जमिनीतून होणारे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते, त्यामुळे जमीन जास्त काळ ओलसर राहते आणि सिंचनाची गरजही घटते. सावलीत वाढ झाल्यामुळे फळे व भाजीपाला अधिक चकचकीत, आकाराने चांगले आणि रंगाने आकर्षक होतात, ज्यामुळे बाजारात चांगला दर मिळतो. याशिवाय गारपीट, जोरदार वारा आणि मुसळधार पावसाचे थेंब थेट पिकांवर पडत नसल्याने पिकांचे नुकसान टाळता येते आणि उत्पादन सुरक्षित राहते. फॅब्रिक कव्हरची टिकाऊक्षमता चांगली असल्यामुळे ३-४ हंगामात ते सहज वापरता येते.

फॅब्रिक कव्हर : हे हलके आणि पांढऱ्या रंगाचे कापड असून ते पिकांना थेट उन्हापासून जास्त संरक्षण देते. या कव्हरमुळे जमिनीतला ओलावा टिकून राहतो, बाष्पीभवन कमी होते आणि सिंचनाची गरजही कमी पडते. उन्हाळी हंगामात याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मावा, पांढरी माशी, फुलकिडे यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी हे कव्हर विशेष उपयुक्त ठरते.


प्लास्टिक कव्हर : हे सहसा पॉलिथिन फिल्मपासून बनवलेले असते. हे सलग म्हणजे बिना छिद्रांचे असते, म्हणजे हवा किंवा पाणी यातून आरपार जाऊ शकत नाही. त्यामुळे खाली जास्त उष्णता आणि आर्द्रता निर्माण होते.

वापर : द्राक्ष, डाळिंब, ढोबळी मिरची, केळी, काकडी, टरबूज आणि इतर भाजीपाला पिकांवर याचा वापर केला जातो.

खर्च : क्रॉप कव्हरमध्ये गुंतवणूक सुरुवातीला महाग वाटू शकते, परंतु त्याचे फायदे, टिकाऊपणा आणि वाढणारे उत्पादन यामुळे ही गुंतवणूक दीर्घ काळासाठी फायदेशीर ठरते. हे कव्हर कृषि सेवा केंद्रांमध्ये, दुकानात तसेच ऑनलाईन उपलब्ध होऊ शकते.

# पेरूवरील नवी केसाळ शेपटाची मावा कीड

पेरू हे पीक शेतकऱ्यांमध्ये विशेष लोकप्रिय होत आहे. या पिकावर आढळणाऱ्या फळमाशी, पिठ्या ढेकूण, चक्राकार पांढरी माशी, साल खाणारी अळी इ. किडी महत्त्वाच्या आहेत. मात्र अलिकडे पेरू पिकावर यापूर्वी क्वचितच दिसून आलेल्या मावा किडीचा तीव्र प्रादुर्भाव राज्यातील अनेक भागांत दिसून येत आहे. विविध ठिकाणच्या प्रक्षेत्र भेटी व निरीक्षणांमधून पेरू पिकावर मावा किडीच्या दोन वेगवेगळ्या प्रजाती आढळून येत आहेत. त्यांची शास्त्रीय नावे 'ग्रीनआयडिया सीडीआय' व ॲफिस प्रजाती अशी आहेत. यापैकी ग्रीनआयडिया सीडीआय ही मावा कीड अन्य सर्वसाधारण मावा प्रजातींपेक्षा काहीशी वेगळी आहे. या किडीची जगातील पहिली नोंद १९१६ मध्ये इंडो-मलेशियन किंवा आग्नेय आशियायी प्रदेशात पेरू पिकावर झाली होती. भारतामध्ये ती पहिल्यांदा १९७८ या वर्षा पश्चिम बंगाल राज्यात झाल्याचे उपलब्ध माहितीवरून स्पष्ट होते. ही कीड प्रामुख्याने कोवळ्या शेंडे व नव्या पानांमधून रसशोषत असल्याने पिकाची वाढ खुंटते. शेंडे व पाने विकृत होतात.



परिणामी, उत्पादनात लक्षणीय घट येते.

किडीची ओळख : पिलावस्था- किडीची पिलावस्था पिवळसर तपकिरी रंगाची असून, त्यांच्या पोटाच्या पृष्ठीय भागावर गडद तपकिरी ठिपके स्पष्टपणे दिसतात. पंखरहित प्रौढ - या किडीच्या पंखरहित प्रौढ अवस्थेतील देहयष्टी अग्रभाग निमुळता व उदर भाग फुगीर अशी वैशिष्ट्यपूर्ण असते. शरीराचा रंग चमकदार गडद तांबूस तपकिरी ते पिवळसर तपकिरी असतो. पोटाच्या पृष्ठीय बाजूच्या पुढील भागावर गडद तपकिरी रंगाची आडवी पट्टी स्पष्टपणे दिसते. नळीसारखे अवयव (सिफंक्युली) पिवळसर तपकिरी रंगाचे असून, मुळाशी व टोकाजवळ रंग अधिक गडद असतो. हे अवयव टोकाकडे बाहेरच्या बाजूला वळलेले असून, त्यावर अनियमित अंतरावर काट्यासारख्या सूक्ष्म रचना आढळतात.

सिफंक्युलींवर जाळीसदृश रचना केवळ मुळाशीच दिसते; ती संपूर्ण लांबीवर आढळत नाही. डोके, शरीर व सिफंक्युलींवर लांब केस (सेटी) स्पष्टपणे दिसून येतात. शरीराच्या वरच्या बाजूवरील बहुतेक केस जाड असून, त्यांच्या टोकास फांदीसारखी किंवा बहुखंडी रचना आढळते, हेच या प्रजातीचे महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण ओळख लक्षण आहे. अँटेना (शृंगिका) शरीराएवढे किंवा शरीरापेक्षा किंचित जास्त लांबीचे असतात. या किडीच्या पंखरहित प्रौढाची एकूण शरीर लांबी साधारणतः १.५ ते २.४ मि.मी. इतकी असते. पंखधारी प्रौढ - ही अवस्था तुलनेने अधिक निमुळत्या शरीराची असून, त्यांचे सिफंक्युली अधिक लांब व गडद रंगाचे, साधारणतः शरीराच्या लांबीच्या सुमारे तीन-चतुर्थांश इतके असतात.

जीवनचक्र : ही कीड मुख्यतः अलैंगिक प्रजननाद्वारे पिलांना थेट जन्म देते. जन्मलेली पिले वाढीच्या प्रक्रियेत अनेक इन्स्टार पूर्ण करीत हळूहळू प्रौढ अवस्थेकडे वाटचाल करतात. या दरम्यान शरीररचनेत क्रमाक्रमाने बदल होत जातात. मात्र पूर्ण कायांतर होत नाही. त्यामुळे या किडीत अपूर्ण कायांतर आढळते.

नुकसानीचे स्वरूप : या किडीची पिले व प्रौढ अवस्था कोवळ्या पानांवर तसेच शेंड्याकडील भागावर समूहाने रस शोषण करतात. या रस शोषणामुळे कोवळी पाने वाकडी-तिकडी होऊन गुंडाळली जातात. परिणामी झाड अशक्त बनते. त्याची नैसर्गिक वाढ खुंटते. याशिवाय ही कीड आपल्या विष्ठेद्वारे मधासारखा चिकट द्रव (हनीड्यू) स्रवते. या स्रावावर काळ्या बुरशीची वाढ होऊन प्रकाश संश्लेषणाची क्रिया मंदावते. परिणामी झाडाची उत्पादनक्षमता कमी होऊन एकूण उत्पादनात लक्षणीय घट येते.

व्यवस्थापन : नत्रयुक्त खतांचा संतुलित वापर करावा. शेतात पिवळ्या चिकट सापळ्यांचा वापर करून किडीचे नियमित सर्व्हेक्षण करावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निमयुक्त कीटनाशकाची फवारणी परिणामकारक ठरू शकते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारतीय प्रजासत्ताक दिन - भारत

**महत्वाच्या घटना**

१५६५ : विजयनगर साम्राज्य आणि दख्खनचे सुलतान यांच्यात तालिकोटा येथे लढाई झाली. या लढाईत रामरायाचा पराभव होऊन दक्षिण भारतात अनिर्बंध मुस्लिम सत्तेला सुरूवात झाली.
१६६२ : लोहगड-विसापूर आणि तिकोना या किल्ल्यांच्या परिसरात मुघल फौजांच्या चढाया
१८३७ : मिचिगन हे अमेरिकेचे २६ वे राज्य बनले.
१८७६ : मुंबई आणि कलकत्ता दरम्यान रेल्वे वाहतुकीस सुरूवात झाली.
१९२४ : रशियातील सेंट पीट्सबर्गचे लेनिनग्राड असे नामकरण करण्यात आले.
१९३३ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वसाहतीच्या स्वराज्याऐवजी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करून २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन मानण्याला सूरुवात केली. स्वातंत्र्यदिन साजरा केल्याने देशात धरपकड झाली. पुढे प्रत्यक्षात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्याने २६ जानेवारी १९५० या दिवशी प्रजासत्ताक राज्यपध्दती स्वीकारली जाऊन तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होऊ लागला.
१९४२ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजांचे युरोपातील नॉर्दन आयर्लंड येथे आगमन
१९५० : एच. जे. कनिया यांनी भारताचे पहिले सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९५० : भारताची राज्यघटना अस्तित्त्वात आल्याने भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र बनले. भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा शपथविधी झाला.
१९७८ : महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा सुरू
१९९८ : कॅप्टन लक्ष्मी व उषा मेहता यांना 'पद्मविभूषण' पुरस्कार प्रदान
२००१ : गुजरातमधील कच्छ भागात झालेल्या मोठ्या भूकंपात सुमारे २०,००० लोक ठार झाले.

**जन्मदिवस । जयंती । वाढदिवस**

१८९१ : 'चंद्रशेखर' शिवराम गोर्हे बडोद्याचे राजकवी, 'गोदागौरव' आणि 'कविता रति' ही त्यांची विशेष गाललेली काव्ये आहेत. (मृत्यू: १७ मार्च १९३७)
१९२१ : अकिओ मोरिटा सोनी कार्पोरेशनचे संस्थापक (मृत्यू: ३ आक्टोबर १९९९)
१९२५ : पॉल न्यूमन अभिनेता, दिग्दर्शक व रेस कार ड्रायव्हर (मृत्यू: २६ सप्टेंबर २००८)
१९५७ : शिवलाल यादव क्रिकेटपटू

**मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन**

१७३० : कवी श्रीधर यांनी समाधि घेतली (जन्म)
१८२३ : एडवर्ड जेन्नर देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर (जन्म: १७ मे १७४९)
१९५४ : मानवेंद्रनाथ रॉय देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक (जन्म: २१ मार्च १८८७)
१९६८ : लोकनायक माधव श्रीहरी तथा 'बापूजी' अणे (जन्म: २९ ऑगस्ट १८८०)
२०१५ : रासीपुरम कृष्णस्वामी तथा आर. के. लक्ष्मण व्यंगचित्रकार, पद्मभूषण (१९७१), रॅमन मॅगसेसे (१९८४), पद्मविभूषण (२००५) इत्यादि पुरस्कारांचे मानकरी (जन्म: २४ आक्टोबर १९२१)

# बटाट्याच्या भरघोस उत्पादनासाठी बेणे निवड आणि बेणेप्रक्रिया महत्वाची



बटाटा लागवड करायचे असेल तर बटाटा पीक यशस्वी होण्यासाठी जमिनीच्या निवडीप्रमाणे योग्य वेळी लागवड अत्यंत महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे लागवड तर गादी वाफ्यावर केली तर पाण्याचा निचरा होण्याची समस्या दूर होते. बटाटा पिकाची वाढ आणि विकास जमिनीच्या आत होत असतो.

बटाटा लागवड आधीबेणे निवड : बटाटा लागवड करण्याआधी,कंदाची सुप्तावस्था पुर्ण झालेल्या कंदाची निवड करावी. बटाट्याची काढणी केल्याबरोबर ताबडतोब लागवडीसाठी बेण्याची निवड करू नये. बटाट्यामध्ये सुप्तावस्था असल्यामुळे काही काळ साठवणूक केल्यानंतर ज्या बेण्यावर कार्यक्षम डोळ्यांचे संख्या जास्त असते.अशा बेण्याची निवड करावी. साधारणतः एक हेक्टर लागवडीसाठी १५ ते २० क्विंटल बेणे आवश्यक असते. जर बेणेतीस ते पस्तीस ग्रॅम वजनापेक्षा जास्त असल्यास अशा बेण्याची दोन चार भागांमध्ये कापणी करावी. परंतु कापणी करत असतांना कार्यक्षम डोळ्यांना इजाहोणार नाही याची काळजी घ्यावी. कापणी केल्यानंतर बेण्याचे वजन देखील साधारणता तीस पस्तीस ग्रॅम असावे.

लागवडीआधी बेणेप्रक्रिया : बटाटा पिकामध्ये उशिरा येणारा व लवकर येणारा करपा रोगाच्या प्रामुख्याने प्रादुर्भाव असतो. तो टाळण्यासाठी बटाटा बेणे लागवडीपूर्वी मॅन्कोझेब तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात किमान अर्धा तास बुडवावीत. वीस क्विंटल बियाण्यासाठी सुमारे शंभर लिटर पुरेसे होते. त्यानंतर बटाटा बेण्याच्या वाढीसाठी नत्रयुक्त घटकांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने अडीच किलो ॲझेटोबॅक्टर अधिक ५०० मिली द्रवरूप ॲसिटोबॅक्टर प्रति १०० लिटर पाणी या द्रावणात बटाटेकिमान अर्धा तास बुडवून ठेवावेत. हे द्रावण वीस क्विंटल बटाटा बेण्यासाठी पुरेसा आहे.

# रेल्वेत दाम्पत्याची लूट : मुंबई-नांदेड एक्स्प्रेसमधील धक्कादायक घटना

पूर्णा । प्रतिनिधी

मुंबई - नांदेड धावणाऱ्या राजाराणी एक्स्प्रेसमधील वातानुकूलित डब्यात चोरीची घटना घडूनही रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलिसांना चोरट्यांचा सुगावा लागलेला नाही. ए.सी. कोचमधील प्रवाशाची सुमारे ७० हजार रुपयांची लूट झाली असून, पूर्णा रेल्वे स्थानकावरील सुरक्षा व्यवस्थेचा फोलपणा पुन्हा एकदा उघड झाला आहे.

मुंबई येथून नांदेडकडे प्रवास करणारे अरुण गणेशराव हट्टेकर (वय ४२, रा. सफाळे, ता. जि. पालघर) हे पत्नीसमवेत राजाराणी एक्स्प्रेसच्या बी/३ कोचमधील बर्थ क्रमांक ३३ व ३४ वरून प्रवास करत होते. शनिवारी पहाटे सुमारे ५ ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान, परभणी स्थानक सोडत असताना अज्ञात चोरट्यांनी झोपेत असलेल्या प्रवाशांची ब्राऊन रंगाची लेदर बॅग लंपास केली. ही बाब गाडी पूर्णा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर आल्यानंतर लक्षात आली. चोरीस गेलेल्या बॅगेत सुमारे ५० हजार रुपये किमतीचा




आयफोन, २० हजार रुपये रोख, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड तसेच अन्य महत्त्वाची कागदपत्रे होती. चोरटे पूर्णा स्थानकावरच डब्यातून उतरले असावेत, असा संशय प्रवाशांनी व्यक्त केला आहे. रेल्वे प्रशासनाकडून पूर्णा स्थानकावर सीसीटीव्ही कॅमेरे, नियमित गस्त आणि सुरक्षा कर्मचारी असल्याचा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात ए.सी. डब्यात चोरी होऊनही कोणालाही संशय येत नाही, ही बाब सुरक्षा यंत्रणेच्या हलगर्जीपणाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. या प्रकरणी नांदेड लोहमार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०२१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (सी) अंतर्गत अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत. दरम्यान, ''ए.सी. कोच सुरक्षित असतो'' हा प्रवाशांचा समज चुकीचा ठरत असून, झोपेत असलेल्या प्रवाशांना लुटून चोरटे सहज पसार होत आहेत. रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलिस केवळ गुन्हा नोंदवण्यापुरतेच मर्यादित राहत असल्याची तीव्र नाराजी प्रवाशांतून व्यक्त होत आहे. पूर्णा रेल्वे स्थानकावरून धावणाऱ्या गाड्यांची संख्या आणि प्लॅटफॉर्मवरील अपुरी सुरक्षा व्यवस्था यामुळे चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. सुरक्षा रक्षकांच्या निष्काळजीपणामुळे हे स्थानक चोरट्यांसाठी सुरक्षित ठिकाण बनत आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सीसीटीव्ही फुटेज, गस्तीतील त्रुटी आणि जबाबदार अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी होणार की प्रकरण पुन्हा थंड बस्त्यात जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार गटाची कार्यकारणी जाहीर



अंबड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार गटाची स्वतंत्र तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली . प्रदेशअध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार व माजी आमदार शिवाजीराव चोथे यांच्या शिफारसीने रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष मा.आ. अरविंद चव्हाण यांनी नियुक्ती पत्र देऊन कार्यकारणी जाहीर केली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अंबड तालुका अध्यक्ष पदी श्री सतीश धुपे , तालुका उपाध्यक्ष ,बाबासाहेब कोल्हे ,व अंबड शहराध्यक्ष नंदकिशोर पुंड ,तालुका सरचिटणीस अमोल टोपे,सय्यद इरफान , युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष अभिजित खटके यांची नियुक्ती केली असल्याचे प्रसिद्धी पत्रकातून देण्यात आली आहे.

ह्या नियुक्ती बद्दल अंबड येथे मा. आ. चोथे यांच्या कार्यालयात नवनियुक्त पदाधिकारी यांचा सत्कार श्री विनायक चोथे, नगरसेवक रामशेठ लांडे यांनी केला आहे. या निवडीतून तालुक्याच्या राजकारणात तरुणांना संधी देण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रयत्न असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तरुणांना संधी देणार असल्याची भावना प्रसिद्धी पत्रकातून मा.आ. शिवाजी चोथे यांनी व्यक्त केली.

## थोडक्यात



### जिजामाता कॉलनीत भाजपा नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

जालना । प्रतिनिधी

जिजामाता कॉलनी, जालना येथे जालना शहर महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग क्रमांक १ मधील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सत्कार सोहळ्यात नवनिर्वाचित नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशीला भास्करराव दानवे, सौ. पदमा अजित मानधानी, सौ. ज्योती रवी सले व श्री. कल्याण भदनेकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जीवन सले, सुनील पवार, संजय डोंगरे, रोशन चौधरी, तुलजेश चौधरी, रोहित नलावडे यांच्यासह जिजामाता कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मा. नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे यांनी प्रभाग क्रमांक १ हा राज्यात आदर्श (मॉडेल) प्रभाग म्हणून विकसित करण्यात येईल, तसेच जिजामाता कॉलनीतील उर्वरित विकासकामे प्राधान्याने पूर्ण केली जातील, अशी ग्वाही दिली. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला न्याय देत लोकाभिमुख व पारदर्शक कारभार करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

### लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

धाराशिव । प्रतिनिधी

लग्नाचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार मार्च २०२५ पासून ते १८ जा-नेवारी २०२६ पर्यंत सुरू होता. नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील तरुणाने पीडितेला लग्नाचे आश्वासन दिले होते. याच आमिषापोटी त्याने वेळोवेळी तरुणीला शेतात नेऊन तिच्यावर अमानुष लैंगिक अत्याचार केला. पीडितेने या कृत्याचा विरोध केला असता, आरोपीने या घटनेबाबत कोणालाही सांगितल्यास तिला तसेच तिच्या कुटुंबीयांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. आरोपीच्या जाचाला कंटाळून अखेर पीडितेने २१ जानेवारी रोजी नळदुर्ग पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी याप्रकरणी गांभीर्याने दखल घेत आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पीडित तरुणी आणि आरोपीची ओळख उघड होऊ नये, याकरिता पोलिसांनी त्यांची नावे गोपनीय ठेवली आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### तोंडापुर यात्रेत जुगार अड्ड्यावर छापा

हिंगोली । प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील तोंडापुर शिवारात असलेल्या सिद्धेश्वर महादेव मंदिराजवळ सुरू असलेल्या यात्रेत जुगार अड्ड्यावर आखाडा बाळापूर पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून ६३ हजार ३३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर ठिकाणी यात्रेत पैशांवर झना मना नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक विष्णुकात गुठे यांच्या पथकाने छापा टाकला. तर ठिकठिकाणी जुगार खेळत असल्याचे दिसले असता पोलिसांनी जुगार खेळताना पकडले. या दरम्यान पोलीस आले समजतात जुगारी पोलिसांना पाहून पळ काढला व काहीना पोलिसांनी ताब्यात घेतले. या छाप्यात रोख रक्कम तसेच विविध कंपन्यांचे अँड्रॉईड मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे आखाडा बाळापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. या प्रकरणी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये तोंडापुर,कुर्तडी. गिरगाव व लिंबाळा परिसरातील रहिवाशांचा समावेश आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक, हिंगोली व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आखाडा बाळापूर पोलीस निरीक्षक विष्णुकांत गुठे ,पोलीस उपनिरीक्षणक गणेश गोटके, शिवाजी पवार, व पोलीस पथकांनी कारवाई केली.

# संचमान्यता, पदोन्नती व समायोजनानंतर शिक्षकांच्या बदल्या

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या बदल्या शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर मध्येच होतात. बदलीनंतर शिक्षकांना त्या शाळांमध्ये रुजू होण्यासाठी काही दिवस लागतात. शिक्षक मधूनच बदलून गेल्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही होतो. या पार्श्वभूमीवर आता शिक्षकांच्या बदल्या ३१ मे पूर्वी होणार आहेत. तत्पूर्वी, संचमान्यतेनुसार रिक्त, अतिरिक्त पदांवर शिक्षकांच्या नेमणुका होतील. त्यानंतर रिक्त राहिलेल्या पदांची बिंदुनामावली निश्चित होऊन जिल्हांतर्गत बदल्या होणार आहेत.

शिक्षकांच्या संचमान्यतेची माहिती पुण्याला शिक्षण विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाला तपासणीसाठी पाठवण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील संचमान्यतेच्या प्रस्तावात २११ दुरूस्त्या निघाल्या असून त्या पुण्याच्या कार्यालयाला कळवण्यात आल्या आहेत. या दुरूस्त करून संचमान्यता अंतिम करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्याकडून सांगण्यात आले. नगर जिल्हा परिषदेच्या साडेतीन हजारांहून अधिक शाळा आहेत. त्याअंतर्गत १० हजार ५०० वर शिक्षक कार्यरत आहेत. पण, यंदा पटसंख्या घटल्याने काही शिक्षक अतिरिक्त झाले आहेत.

आता संचमान्यता झाल्यावर त्या अतिरिक्त शिक्षकांचे पहिल्यांदा समायोजन होईल. त्यानंतर रिक्त झालेल्या पदांची जात संवर्गनिहाय माहिती संकलित केली जाणार आहे. बदलीपात्र शिक्षकांकडून त्यांची पसंती घेऊन बदली प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्याच दरम्यान, २० ते २५ वर्षांपासून स्वत:च्या जिल्ह्यात बदली करून जाण्यास इच्छुक शिक्षकांना देखील आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून एक संधी दिली जाण्याची शक्यता आहे. कारण, राज्यात जूनपूर्वी सुमारे दहा हजार शिक्षकांची भरती होणार आहे. भरतीतील नवे शिक्षक रिक्त पदे असलेल्या जिल्ह्यांमध्ये भरणे शक्य होणार आहे. माहिती संकलित केली जाणार आहे.

बदलीपात्र शिक्षकांकडून त्यांची पसंती घेऊन बदली प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्याच दरम्यान, २० ते २५ वर्षांपासून स्वत:च्या जिल्ह्यात बदली करून जाण्यास इच्छुक शिक्षकांना देखील आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून एक संधी दिली जाण्याची शक्यता आहे. कारण, राज्यात जूनपूर्वी सुमारे दहा हजार शिक्षकांची भरती होणार आहे. भरतीतील नवे शिक्षक रिक्त पदे असलेल्या जिल्ह्यांमध्ये भरणे शक्य होणार आहे.

# उमरगा तालुक्यात निवडणुकीसाठी २५३ उमेदवार रिंगणात

उमरगा । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीत २७० उमेदवारांनी ५४० नामनिर्देशन पत्राची खरेदी केली होती. दोन्ही मिळून १६३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दाखल अर्जाची छाननी प्रक्रिया गुरूवारी (दि २२) पार पडली. छाननीत जिपचे ९० जणांचे तर पंचायत समिती गणांसाठी १६३ जणांचे अर्ज वैध ठरले.

उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद ९ गट व पंचायत समिती १८ गण निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदती अखेरपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत २७० जणांनी ६३९ उमेदवारी अर्ज घेतले होते. यात जिप २७८ तर पंचायत समिती ३६१ अर्जाचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत बुधवारी दुपारी तीन वाजता संपली. जिल्हा परिषद गटांसाठी ९० जणांनी ११८ तर पंचायत समिती गणासाठी १६३ जणांनी १९८ दोन्ही मिळून २५३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद येरमे यांच्या उपस्थितीत दाखल अर्जाची छाननी प्रकीया पार पाडली, यावेळी लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निरिक्षक शिल्पा करमरकर, माजी खासदार प्रा रविंद्र गायकवाड, आमदार प्रवीण स्वामी आदिसह उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधींच्या उपस्थितीत छाननी प्रक्रिया पार पडली. छाननी प्रक्रियेत जिल्हा परिषद गटाच्या ९ जागेसाठी ९० अर्ज तर पंचायत समितीच्या १८ गणासाठी १६३ वैध ठरले. छाननीत वैध ठरलेले नामनिर्देशन पत्र उमेदवारांना मंगळवारी (दि २७) जानेवारी दुपारी तीन वाजेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. त्यानंतर निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी दिली.

# पतीच्या निधनाचा धक्का; पत्नीनेही सोडले प्राण

औसा । प्रतिनिधी

लग्न हे साताजन्माचे बंधन असते आणि सुख-दुःखात एकमेकांचे सोबती राहायचे असते, ही म्हण औसा तालुक्यातील एकंबी तांडा येथील एका वृद्ध दाम्पत्याने खरी करून दाखवली आहे. सकाळी पतीचे निधन झाले आणि सायंकाळी ही वार्ता कळताच पतीच्या विरहाने व्याकुळ झालेल्या पत्नीनेही आपले प्राण सोडले. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. रेवा खेमा जाधव (वय ८५) आणि धानाबाई रेवा जाधव असे या रेवा जाधव दाम्पत्याचे नाव आहे.

एकंबी तांडा येथील ज्येष्ठ नागरिक रेवा जाधव यांचे शुक्रवारी (दि. २४) सकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सकाळी १० वाजता त्यांच्या पार्थिवावर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. रेवा जाधव यांच्या पत्नी धानाबाई या मागील १० वर्षांपासून आजारी होत्या. या दीर्घ आजारपणाच्या काळात रेवा जाधव यांनी आपल्या पत्नीची अत्यंत निष्ठेने आणि प्रेमाने सेवा केली होती. मात्र, नियतीचा खेळ विचित्र असतो. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता जेव्हा धानाबाईंना पतीच्या निधनाची बातमी देण्यात आली, तेव्हा त्या कोसळल्या. ज्यांनी आजारपणात माझी आईप्रमाणे सेवा केली, तेच सोडून गेल्यावर मी तरी कशी जगू? या धक्क्याने आणि पतीच्या विरहाने त्यांचीही प्राणज्योत मालवली. आजच्या काळात नात्यांमधील वीण सैल होत असताना, रेवा आणि धानाबाई जाधव यांचे उदाहरण समाजासाठी आदर्श ठरले आहे. पत्नी आजारी असताना सेवा आणि पतीच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने पत्नीने सोडलेले प्राण, हे प्रेम आणि निष्ठेचे एक दुर्मिळ उदाहरण असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# रस्ता नसल्यामुळे मतदानावर बहिष्कार

अहमदपूर । प्रतिनिधी

स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही साध्या पक्क्या रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने अहमदपूर तालुक्यातील ब्रह्मवाडी येथील ग्रामस्थांनी प्रशासकीय अनास्थेचा निषेध म्हणून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर पूर्णतः बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ''जोपर्यंत रस्ता होत नाही, तोपर्यंत मतदान नाही'' असा पवित्रा घेत गावकऱ्यांनी गावच्या मुख्य रस्त्यावर आणि घराघरांवर बहिष्काराचे बॅनर लावून संताप व्यक्त केला आहे.

ब्रह्मवाडी ते मोघा (ग्रामीण मार्ग ४२) हा साधारण २ ते ३ किलोमीटरचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार स्वातंत्र्यानंतर या रस्त्याचे केवळ एकदाच डांबीकरण झाले होते. त्यानंतर गेल्या अनेक दशकांत या रस्त्याची साधी डागडुजीही करण्यात आली नाही. रस्ता पूर्णपणे उखडल्यामुळे शेतकऱ्यांना खते, बियाणे आणताना आणि शेतमाल बाजारात नेताना मोठी कसरत करावी लागते. रस्त्याअभावी गावात रुग्णवाहिका किंवा खासगी वाहने वेळ वर येत नाहीत. तसेच विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी चिखल तुडवत पायपीट करावी लागते. निवडणुका आल्या की राजकीय नेते मतांसाठी गावात येतात आणि रस्ता करण्याचे आश्वासन देतात. मात्र, निवडणूक जिंकल्यानंतर पाच वर्षे या गावाकडे कोणीही फिरकत नाही, असा अनुभव ग्रामस्थांनी बोलून दाखवला. वारंवार निवेदने देऊनही जिल्हा परिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर ग्रामस्थांनी सामूहिक बैठकीत निवडणुकीवर बहिष्काराचा एकमुखी ठराव मंजूर केला. गावकऱ्यांनी केवळ ठराव करूनच थांबले नाहीत, तर संपूर्ण गावात निषेधाचे वातावरण आहे. गावच्या प्रवेशद्वारावर, सार्वजनिक ठिकाणी आणि प्रत्येक घरासमोर निवडणुकीवरील वहिष्काराचे फलक झळकत आहेत. खराब झालेल्या रस्त्याच्या मध्यभागीच बॅनर लावून प्रशासनाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम ग्रामस्थांनी केले आहे. प्रशासकीय अधिकारी मनधरणी करण्याचा प्रयत्न करत असले, तरी ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. आम्ही आमचा निर्णय प्रशासनाला कळवला आहे. अधिकारी आता पुन्हा आश्वासन देत आहेत, पण पोकळ आश्वासनांना आम्ही आता भुलणार नाही. आधी प्रत्यक्ष रस्ता व्हावा, मगच आम्ही मतदानाचा विचार करू, असे ग्रामस्थांनी सांगितले.

# यशवंत विद्यालयात रस्ता सुरक्षा अभियाना निमित्त विविध स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत यशवंत विद्यालय बीड मध्ये दि. २५ जानेवारी २०२६ रविवार रोजी विविध स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा वाहतूक शाखाप्रमुख सुभाष सानप यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी व पालकांशी बोलताना वाहतुकीच्या नियमामुळे आपला प्राण वाचू शकतो. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून वाहतुकीच्या नियमांची सवय लावून घेतली पाहिजे.

पायी चालताना व सायकल चालवताना सुद्धा रस्ता वाहतूक नियमांचे पालन करावे ,अपघात कोणत्या कारणाने होतात याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ म्हणाले की, सर्वात जास्त अपघात महामार्गांवर होतात. रस्ते वाहतुकीच्या नियमाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. सर्वांनी वाहतुकीच्या नियमाचे पालन केले तर अपघात कमी होतील.सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले की, शालेय अल्पवयीन मुलानी पन्नास सी.सी. क्षमतेच्या पुढील दुचाकी चालू नये



.दुचाकी चालवल्यास विद्यार्थी व पालकांवर गंभीर गुन्हा दाखल होऊ शकतो. दुचाकी अपघातात सर्वाधिक मृत्यू हे डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे होतात. त्यामुळे दुचाकी चालक व मागे बसलेल्यांनी देखील हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. सायकल चालवताना विद्यार्थ्यांनी देखील रस्ता सुरक्षितेचे नियम काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे. सायकल रस्त्याने चालवताना स्टंटबाजी, दंगामस्ती करू नये. प्रत्येक नागरिकांनी देखील रस्ता सुरक्षितेचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. नुकतेच केज- बीड रस्त्यावर अपघातग्रस्त धीरज भवर यास तातडीचे जिल्हा रुग्णालयात दाखल करून त्याचे प्राण वाचवल्याबद्दल लेक लाडकी अभियानाचे जिल्हाप्रमुख बाजीराव ढाकणे व सौ. आशाताई ढाकणे यांचा जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप सह मान्यवरांनी ढाकणे दांपत्याचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. समुपदेशक मनीषा बिक्कड यांनी विद्यार्थ्यांना तसेच पालकांना परीक्षेबाबत तसेच रस्ता वाहतुकी बाबत मानसिक आरोग्याची कशी आवश्यकता असते त्याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पी.एस.आय. विजय जाधवर, सूत्रसंचालन यशवंत विद्यालयाचे शिक्षक गाडेकर के.बी. तर आभार पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे यांनी मानले, प्रशासना मधील पोलीस कर्मचारी सखाराम घोलप, राजाभाऊ तांदळे, शुभम सानप, संतोष काटकर, नारायण वाघमारे तसेच शाळेतील शिक्षक एम.जी. गायकवाड, एम. बी. गीते,पी.पी. घुगे, एन.एस. सेवक नवनाथ धुरंदरे आदींनी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. मार्गदर्शनपर कार्यक्रमात विद्यार्थी, विद्यार्थिनी ,शिक्षक पालक नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# दिवसा-ढवळ्या सराफा व्यापाऱ्याला शस्त्राचा धाक दाखवत ६० लाखांचे दागिने लुटले

## ३५० ग्राम सोन्याचे दागिन्यासह ३ किलो चांदीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लुटले; घटनास्थळाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाची भेट

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील अनेक सराफा व्यापारी गावोगावी जाऊन सोन्या-चांदीचे दागिने विकण्याचे काम करतात. अशाच एका सराफा व्यापाऱ्याकडून दि.२५ जानेवारी रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता भर दिवसा शस्त्राचा धाक दाखवत ६० लाख रुपयांचे दागिने लुटल्याची घटना घडली आली आहे. या घटनेने शहरातील सराफा व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की, माजलगाव शहरातील हनुमान चौक येथे अमोल पंढरीनाथ गायके यांचे अमोल ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. ते नेहमी आपल्या मोटरसायकल वरुन विविध गावांमध्ये जाऊन सोन्या-






चांदीच्या दागिन्यांची विक्री करत असतात.दि २५ जानेवारी रविवार रोजी सकाळी ९:०० वाजता ते घरातून निघाल्यानंतर, साडेनऊच्या सुमारास तालखेड फाटा परिसरात पोहोचले.तेथून पुढे खेर्डा गावाकडे जात असताना,त्यांच्या पाठीमागून एका चारचाकी वाहनातून अज्ञात चोरट्यांनी पाठलाग सुरू केला.रस्त्यावर कोणीही नसल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्याच्या मोटरसायकल समोर चारचाकी वाहन आडवे लावले चोरट्यांनी दागिन्यांची बॅग देण्याची मागणी केली. व्यापाऱ्याने नकार दिल्यानंतर, चोरट्यांनी कोयता, गज यांसारखी शस्त्रे दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली.यानंतर व्यापाऱ्याच्या हातातील दागिन्यांची बॅग हिसकावून अज्ञात चोरट्यांनी घटनास्थळावरून चार चाकी वाहनांने पसार झाले.

३५० सोन्याचे दागिने,३ किलो चांदीचे दागिने चोरट्यांनी लुटले

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार,सराफ आमोल गायके यांच्याकडून ३५० ग्रॅम सोन्याचे विविध दागिने (अंदाजे किंमत ५० लाख) आणि३ किलो चांदीचे विविध दागिने (अंदाजे किंमत १० लाख),असा एकूण सुमारे ६० लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची घटनास्थळी भेट

घटनेची माहिती काही क्षणांतच माजलगाव शहरात वाऱ्यासारखी पसरली.माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.तसेच, तात्काळ आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून,बीड येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागच्या पथकानेही घटनास्थळी भेट देत तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

### दिवसा-ढवळ्या घडलेल्या घटनेने व्यापारी व नागरिकांमध्ये भीती,रोष

या घटनेनंतर माजलगाव शहर व परिसरातील सराफा व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहर व ग्रामीण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरी व दरोड्याच्या घटना वाढत असल्याने, नागरिकांमध्ये पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त केली जात असून,कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# सौताडा येथे एसटी बसची उभ्या ट्रॅक्टरला धडक






सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा नजीक असलेल्या रामेश्वर फाटा येथे आज एक भीषण अपघात झाला. बीडहून अहमदनगरकडे जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रॅक्टरला जोराची धडक दिली. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई वसई कडे जाणारी एसटी महामंडळाची बस क्रमांक चक-१४-२६८७ ही बीड आगारातून अहमदनगरच्या दिशेने प्रवाशांना घेऊन जात होती. रामेश्वर फाटा परिसरात आली असता, चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने ही बस रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टरवर जाऊन आदळली. धडक इतकी भीषण होती की बसच्या दर्शनी भागाचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघातावेळी बसमध्ये अनेक प्रवासी प्रवास करत होते. धडक बसताच बसमधील प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. सुदैवाने, या घटनेत कोणतीही मोठी जीवितहानी झाल्याचे प्राथमिक वृत्त नाही, मात्र काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याचे दिसून आले

वाहतूक कोंडी:

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. घटनेनंतर बीड-नगर महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्याचे आणि वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू केले आहे.

एसटी चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाला की तांत्रिक बिघाडामुळे, याचा तपास पोलीस करत आहेत.

# माजलगाव तालुक्यातील देवळा खुर्द येथे रॉयल्टीच्या नावाखाली भरमसाठ मुरूम उत्खनन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील देवळा खुर्द येथील सर्वे नंबर १४६ मध्ये शासन नियमानुसार माजलगाव तहसीलदार यांनी २०० ब्रास मुरूम उत्करणाची रॉयल्टी दिलेली असून या ठिकाणी महसूल अधिकारी आणि कर्मचारी व रॉयल्टी धारक यांच्या आर्थिक व्यवहारातून अधिकचे २००० ब्रास मुरूम उत्खनन करण्यात आली आहे. अशी तक्रार नईम आतार व विवेक जाधव यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर येथील कार्यालयाकडे केली आहे.



याबाबत दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील मौजे देवळा खुर्द येथील सर्वे नंबर १४६ या ठिकाणी माजलगाव तहसीलदार यांनी रॉयल्टी धारकास २०० मुरूम उत्खनन करण्याची परवानगी दिली असून २०० ब्रास मुरूम उत्खननाच्या नावाखाली संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या आर्थिक व्यवहारातून तसेच संगणमाताने मोठ्या प्रमाणात म्हणजेच २००० ब्रास पेक्षा जास्तीचे उत्खनन करण्यात आलेले आहे तरी उत्खनन झालेल्या ठिकाणाचा स्पॉट पंचनामा करण्यात यावा तसेच इ.टी.एस. मशीन द्वारे मोजणी करण्यात यावी यामध्ये दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचारी यांची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे व तक्रारीच्या अनुषंगाने न्याय देण्यात यावा अशी तक्रार रिपाई खरात गट चे बीड जिल्हा सरचिटणीस नईमआतार व सामाजिक कार्यकर्ते विवेक जाधव यांनी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या कार्यालयाकडे केली आहे.

# प्रजासत्ताक दिनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

बीड । प्रतिनिधी

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ सकाळी ०९.१५ वाजता दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी पोलिस मुख्यालय, कवायत मैदान, नगर रोड बीड येथे बाबासाहेब पाटील, मंत्री, सहकार, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमास सकाळी ८.३० वाजेपूर्वी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मंत्री महोदय यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री. ०८:३० वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी, ०८:४५ वा. शासकीय विश्रामगृह बीड येथून पोलिस मुख्यालयाकडे मोटारीने प्रयाण, सकाळी ०९:१० वा. पोलिस मुख्यालय बीड येथे शासकीय ध्वजारोहण समारंभ व इतर शासकीय कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०:४५ वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी १२:३० वा. बीड येथून नेकनूर मार्गे चाकरवाडी ता.बीड कडे मोटारीने प्रयाण. दुपारी ०१.:१५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथे आगमन व माऊली महाराज यांच्या समाधीचे दर्शन. दुपारी ०१:४५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथून केज - अंबाजोगाई मार्गे अहमदपुर कडे मोटारीने प्रयाण.

# ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित रहा -शिवाजी भोसकर, मुदस्सीर

बीड । प्रतिनिधी

आज २६ जानेवारी सोमवार रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम च्या बीड शहरातील मुख्य कार्यालयात बशीरगंज बीड येथे होणार्या ध्वजारोहण आजी माजी नगरसेवक ,पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित रहावे तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात सुद्धा ध्वजारोहण करावे असे आवाहन पक्षाचे बीड शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर, युवा नेते शेख मुदस्सीर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे. या






विषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, मुख्य कार्यालयात ध्वजारोहण करत साजरे करून प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीचे ◀◀ पान ३ वर

# आता डॉ.पंकजा गोपीनाथ मुंडे

## डी.वाय.पाटील विद्यापीठाच्या डी. लिट. पदवीने सन्मानित

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाने आज शैक्षणिक क्षेत्रातील मानाची डी लिट (मानद डॉक्टरेट) पदवी देऊन सन्मान केला. या गौरवाने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



लोहगांव येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ आज मोठया थाटात पार पडला. ना. पंकजाताई मुंडे यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. ना. पंकजाताई मुंडे हया राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री असून पर्यावरण व पशुसंवर्धन खात्यामार्फत गेल्या वर्षभरात अनेक लोकाभिमुख निर्णय त्यांनी घेतले आहेत, याशिवाय सामाजिक कार्यातही त्या सातत्याने अग्रेसर असतात. या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांचा शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी 'मानद डॉक्टरेट' (डी.लिट.) देऊन आज सन्मान केला.या कार्यक्रमास अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष व कुलपती डॉ अजिंक्य पाटील, श्री धरमकुमार सिरजी हाय कमिशनर ऑफ रिपब्लिक ऑफ गायना, डॉ. निशिकांत ओझा मुख्य सल्लागार इंटीग्रेटेड डिफेन्स स्टाफ भारत सरकार, श्रीमती पूजा पाटील चेअरमन डी वाय पाटील विद्यापीठ, आमदार बापूसाहेब पठारे, प्राध्यापक व पदवीप्राप्त विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगावात वसंत पंचमी उत्साहात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

येथील बालाजी मंदिर येथे सरस्वती मातेचे पूजन करून वसंत पंचमी निमित्त दि २४ जानेवारी रोजी माजलगाव मध्ये विधीवत पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

महिला मंडळाच्या अध्यक्षा अलकनंदा मानधने,उपाध्यक्षा वर्षा बजाज, सचिव ◀◀ पान ३ वर

# शिवसेनाप्रमुखांचे धगधगते ज्वलंत विचार हेच आमचे शस्त्र आहे -गोरख सिंघन


बीड । प्रतिनिधी

आज शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बीड तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने तालुक्यात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले व साहेबांची जयंती साजरी करुन साहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक




नतमस्तक झाले .यावेळी बोलताना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदुत्वाचे विचार व २० % राजकारण व ८०% समाजकारण व सर्व धर्मांनचा आदर करा,महिलांना संरक्षण द्या व अन्याय्य सहन करु नका हया त्यांच्या शिकवणीचे आम्ही अनुकरण करत असुन पुढे उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार काम करत आहोत व कायम ते करत राहू असे ते म्हणाले. शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉमलेकस बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप , जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,तालुका सचिव ◀◀ पान ३ वर

# मोठेवाडीत हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे श्री काळा हनुमान कृपेने व जगद्गुरु श्री. संत तुकाराम महाराज जन्म शताब्दी निमित्त गेल्या ३८ वर्षापासून अखंड चालत आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला श्री. काळा हनुमान मंदिरात दि.२४ जानेवारी शनिवार पासुन सुरूवात झाली आहे.यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण आणि देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ होत आहे. कथा श्रवणासाठी मंदिरात भाविकांची गर्दी होत आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.रोज पहाटे ४:०० ते ६:०० काकडा भजन,६:०० ते ७:०० विष्णूसहस्त्रनाम,७:०० ते १०:०० श्री.ह.भ.प. लक्ष्मण महाराज पांचाळ व सौ.चंद्रभागा रणखांब हे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे नेतृत्व करत आहेत.११:०० ते दुपारी १:०० श्री तुकाराम महाराज गाथा भजन,दुपारी २:०० ते ५:०० कथा प्रवक्ते श्री ह.भ.प.आबादेव ◀◀ पान ३ वर

# इंदापूर येथे झाले कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कृषी प्रदर्शनाच्या पोस्टरचे प्रकाशन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे १९ ते २३ फेब्रुवारी२०२६ या कालावधीत होणाऱ्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची निमंत्रण पत्रिका राज्याचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते अजयदादा धोंडे यांच्या हस्ते देण्यात आली तसेच याप्रसंगी कृषी प्रदर्शनाच्या पोस्टरचे अधिकृत प्रकाशनही करण्यात आले, मी कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहील असे आश्वासन ना.



दत्तात्रय भरणे यांनी अजयदादा धोंडे यांना दिले. इंदापूर तालुक्यातील भरणेवाडी येथील ना. भरणे यांच्या निवासस्थानी युवा नेते श्रीराज भरणे, कृषी प्रदर्शनाचे इव्हेंट मॅनेजमेंटचे प्रमुख अजय वाबळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा ◀◀ पान ३ वर

# डॉ.संतोष वनगुजरे यांची बामु क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील गरवारे क्रिकेट ग्राउंड येथे दिनांक २४/०१/२०२६ रोजी झालेल्या निवड चाचणी मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर क्रिकेट संघात अँड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाच्या शेख नूमान, तुषार खवळे व अभय पाटील या खेळाडूची निवड झाली आली. हे खेळाडू सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट (गुजरात) येथे दिनांक २६ ते ३१ दरम्यान २०२६ दरम्यान संपन्न होणाऱ्या आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा २०२५-२६ साठी हा संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान गोवा या राज्यासह अनेक राज्यातीलसंघ सहभागी होणार आहेत. या



क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ.संतोष वनगुजरे यांची प्रशिक्षकपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली हा संघ २५ जानेवारी २०२६ ला राजकोटला रवाना झाला आहे. या संघास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी

क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख कुलसचिव डॉ.अमृतकर सर तसेच खेळाडूंच्या या यशाबद्दल आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे आदरणीय अध्यक्ष मा.श्री किशोर नाना ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्ह्याच्या सुपुत्राला उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक; 'अविनाश शिळीमकर' यांचा सन्मान

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण गुन्हे शाखेत कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना त्यांच्या उल्लेखनीय, कर्तव्यनिष्ठ आणि प्रभावी सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे पुणे जिल्ह्याच्या पोलीस दलाने देशपातळीवर पुन्हा एकदा आपली छाप पाडली आहे. पुणे ग्रामीण गुन्हे शाखेत कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना त्यांच्या उल्लेखनीय, कर्तव्यनिष्ठ आणि प्रभावी सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून पोलीस पदकांची घोषणा करण्यात आली. भोर तालुक्यातील तांबड, गुंजन मावळ हे शिळीमकर यांचे मूळ गाव आहे. त्यांनी प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले, तर पदवी शिक्षण पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून घेतले. सन १९९३ मध्ये त्यांनी पोलीस दलात उपनिरीक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. मुंबईतील येलो गेट, वडाळा आणि एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यांतून त्यांनी सेवा बजावली.

यानंतर मुंबई शहर, सातारा, नागपूर



शहर गुन्हे शाखा, अहिल्यानगर विशेष शाखा आणि सध्या पुणे ग्रामीण गुन्हे शाखा अशा विविध ठिकाणी त्यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांचा एकूण सेवाकाल तब्बल ३२ वर्षांचा आहे. सेवाकाळात त्यांनी अनेक कुख्यात गुन्हेगार टोळ्यांना जेरबंद करत महत्त्वपूर्ण यश मिळवले. पुणे ग्रामीणमध्ये कार्यरत असताना ऊरुळी कांचन परिसरातील कुख्यात आप्पा लोंढे टोळीवर कारवाई करून परिसरातील गुन्हेगारीवर आळा घातला. नागपूर शहरात कार्यरत असताना खून, दरोडा, खंडणीसह तब्बल ३८ गंभीर गुन्हे उघडकीस आणत कुख्यात राजा गौस टोळीचा पर्दाफाश केला. तसेच संतोष आंबेकर टोळीवर कारवाई करून नागपूर शहरातील दहशत संपुष्टात आणण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. अहिल्यानगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जनावरांच्या व शेतीमाल चोरीप्रकरणी स्वतः मैदानात उतरून सराईत टोळ्यांचा छडा लावत चोरीचा मुद्देमाल शेतकऱ्यांना परत मिळवून दिला. कोरोना महामारीच्या काळात पुणे ग्रामीण आणि अहिल्यानगर येथे कार्यरत असताना स्थलांतरित मजुरांसाठी विविध उपाययोजना राबविणे, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. नोव्हेंबर २०२२ पासून पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना दरोडा, जबरी चोरी, घरफोडी तसेच आंतरराज्यीय गुन्हेगार टोळ्यांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली यवत येथील एका कुटुंबातील सात जणांच्या मृत्यूचा गुन्हा आत्महत्येऐवजी खून असल्याचे सिद्ध करणे, सासवड तहसील कार्यालयातील ईव्हीएम चोरीचा छडा लावणे, तसेच महामार्गावरील लुटमार करणाऱ्या टोळ्यांना जेरबंद करणे ही त्यांची ठळक कामगिरी आहे. अवैध अग्निशस्त्र व अमली पदार्थ जप्ती, मोक्का व एमपीडीए अंतर्गत कारवाई, दंगल नियंत्रण तसेच निवडणूक काळातील बंदोबस्त आदी सर्वच बाबींमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व दाखवले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट सेवेसाठी यापूर्वी २०२४ मध्ये त्यांना पोलीस महासंचालक पदकानेही गौरविण्यात आले होते. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे अविनाश शिळीमकर हे पोलीस दलातील आदर्श अधिकारी म्हणून ओळखले जातात. राष्ट्रपती पदकाच्या सन्मानामुळे पुणे जिल्ह्याला पुन्हा एकदा गौरव प्राप्त झाला आहे.

# पवारसाहेब आणि अजितदादांवर टीका करण्याची तुमची पात्रता आहे का? शिवतारेंच्या टीकेनंतर रोहित पवारांचा हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर अत्यंत जहाल शब्दांत टीका केली आहे. शरद पवार यांनी चार वेळा मुख्यमंत्री म्हणून आणि अजित पवार यांनी पाच वेळा उपमुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला असताना, त्यांनी राज्यातील अनेक देवस्थानांना देणग्या दिल्या. मात्र, त्यांना पुरंदर येथील खंडोबा मंदिर आणि तेथील विकासाकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळाला नाही, अशी टीका शिवतारे यांनी केली आहे. आता त्यांच्या या टीकेनंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आक्रमक झाले आहेत.

तीनदा आमदारकी आणि पाच वर्षे मंत्री असूनही मतदारसंघाचा विकास करू न शकणाऱ्या आमदार विजय शिवतारे यांनी आदरणीय पवार साहेब आणि अजितदादा यांच्यावर टीका करण्याची आपली राजकीय पात्रता आहे का? हे आधी तपासावं असा सवाल करत रोहित पवारांनी शिवतारेंवर टीका केली आहे. श्रीक्षेत्र जेजुरी गडासाठी अर्थसंकल्पात घोषणा करून ३५० कोटीच्या विकास आराखड्यास मान्यता देऊन अजितदादांनीच निधी दिला याचा विसर बहुतेक त्यांना पडला असावा. त्यामुळं टीका करताना शिवतारे साहेब यांनी जिभेला लगाम लावण्याची गरज आहे, अन्यथा पोपटासारखं 'मिठू.. मिठू' बोलणाऱ्यांचं काय होतं, याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे अशा शब्दात रोहित पवार यांनी विजय शिवतारे यांच्यावर टीका केली. खरं म्हणजे आज त्यांनी केलेली टीका ही स्वतःच्याच नाकर्तेपणाची दिलेली एकप्रकारे कबुली आहे. ज्या पक्षाने आमदारकी दिली, मंत्रीपद दिलं त्याच पक्षाला



त्यांनी फसवलं. त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार असे रोहित पवार म्हणाले.

विजय शिवतारे यांनी केलेल्या आरोपानुसार, शरद पवार यांनी चार वेळा मुख्यमंत्री म्हणून आणि अजित पवार यांनी पाच वेळा उपमुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला असताना, त्यांनी राज्यातील अनेक देवस्थानांना देणग्या दिल्या. मात्र, त्यांना पुरंदर येथील खंडोबा मंदिर आणि तेथील विकासाकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळाला नाही, असे शिवतारे यांनी म्हटले आहे. टीका करताना शिवतारे यांची जीभ घसरली आणि त्यांनी नेत्यांना उद्देशून नेतेच दळभद्री असे आक्षेपार्ह विधान केले. ते पुढे म्हणाले की, गेल्या ५० वर्षांत विकासाच्या दृष्टीने काहीही झाले नाही. पुरंदर परिसरात आता मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत, ज्यात रस्त्यांचे दुपदरीकरण (डबल लाईन) देखील समाविष्ट आहे. ही कामे आता केली जात असल्यामुळे, पवारांच्या कार्यकाळात या भागाकडे दुर्लक्ष झाल्याचे शिवतारे यांनी अप्रत्यक्षपणे सूचित केले.

# पुणेकरांना पाहता येणार स्वदेशी शस्त्रास्त्रे! दगडूशेठ गणपती ट्रस्टतर्फे लष्करी शस्त्रास्त्रांचे भव्य प्रदर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

देशाच्या संरक्षण सज्जतेला बळकटी देत अभेद्य शस्त्रास्त्रे पुण्यामध्ये गेल्या १५० वर्षांपासून साकारली जात आहेत. ऍम्युनिशन्स इंडिया लिमिटेडतर्फे पुण्यात साकारलेली आणि भारतासह विविध देशांत निर्यात केली जाणारी भारतीय बनावटीची शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हे अनोखे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. गणेशोत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरासमोर दि. २५ व २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०



ते रात्री १० या वेळेत हे प्रदर्शन पुणेकरांना पाहता येणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.प्रदर्शनात भारतीय पायदळ, नौदल, हवाई दलासाठी लागणारी शस्त्रास्त्रे,

दारूगोळ्यांसह विविध प्रकारची युद्धसज्जतेसाठी आवश्यक असलेल्या साधनांची मॉडेल्स देखील ठेवण्यात येणार आहेत. सैन्य दलातील जवान या प्रदर्शनाच्या नियोजनात सहभागी असून, पुणेकरांनी प्रत्येक शस्त्राविषयी माहितीही तात्काळ घेता येणार आहे. ग्रेनेड, लढाऊ विमानातील बॉम्ब, रॉकेटचे विविध प्रकार, तोफांसाठी लागणारा दारूगोळा, विविध प्रकारचे ड्रोन, मल्टी बॅरेल लॉन्च सिस्टिम, बुलेटस्, हँड ग्रेनेड, अँटि सम्बरिन रॉकेट, एरियल बॉम्ब यांसह विविध प्रकारची शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी मिळणार आहे. ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, भारतीय संरक्षण व्यवस्था ही जगातील ४ थी सर्वात शक्तिशाली सैन्यशक्ती आहे. अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. देशाच्या या संरक्षण व्यवस्थेत पुणे हे महत्त्वाचे केंद्र असून, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, सीएमई, डीआरडीओ सारख्या संस्था पुण्यामध्ये आहेत.


त्याचप्रमाणे संपूर्ण देशात शस्त्रास्त्रे पुरविण्यासाठी पुण्यातील ऍम्युनिशन्स इंडिया लिमिटेड कार्यरत असून, त्यांच्या सहकार्याने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी प्रवेश विनामूल्य असून, शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह पुणेकरांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन ट्रस्टने केले आहे.

# आठ दिवसांपासून साताऱ्यातील तरुण बेपत्ता; पुण्यातील लॉजमध्ये मृतदेह आढळल्याने खळबळ; बंद खोलीतून दुर्गंधी

**पुणे । प्रतिनिधी**

सातारा (डरींरीर) जिल्ह्यातील वाई येथून आठ दिवसांपूर्वी अचानक बेपत्ता झालेल्या २७ वर्षीय तरुणाचा पुण्यात (झींपश) मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुणे शहरातील गजबजलेल्या कॅम्प (लष्कर) परिसरातील एका लॉजमध्ये या तरुणाने गळफास घेऊन जीवन संपवल्याचे उघडकीस आले आहे. पीयूष ओसवाल (रा. वाई, जि. सातारा) असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे ओसवाल कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ही घटना कॅम्प परिसरातील 'मुकेश लॉज'मध्ये उघडकीस आली. बुधवारी दुपारी लॉजमधील एका बंद खोलीतून तीव्र दुर्गंधी येऊ लागल्याने कर्मचाऱ्यांना संशय आला. कर्मचाऱ्यांनी संबंधित खोलीचा दरवाजा ठोठावून आवाज दिला; मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन लॉज प्रशासनाने तात्काळ बंडगार्डन पोलीस ठाण्याला माहिती दिली. माहिती मिळताच बंडगार्डन पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दरवाजा



तोडून आत प्रवेश केला असता, पीयूष ओसवाल गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मृतदेहाची अवस्था आणि खोलीत पसरलेली दुर्गंधी पाहता, पीयूषने सुमारे दोन ते तीन दिवसांपूर्वीच आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पीयूष हा मूळचा वाई येथील रहिवासी असून, तो गेल्या आठ दिवसांपासून घरातून निघून गेला होता. घरी न परतल्याने आणि कोणताही संपर्क न झाल्यामुळे कुटुंबीयांनी वाई पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. वाई पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला असतानाच, पुण्यात त्याचा मृतदेह आढळल्याने या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले आहे. घटनास्थळाचा पंचनामा करून बंडगार्डन पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवला आहे. पीयूष पुण्यात कधी आला, तो संबंधित लॉजवर कधीपासून वास्तव्यास होता आणि त्याने हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबतची कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. वाई पोलिसांनाही घटनेची माहिती देण्यात आली असून, दोन्ही पोलीस ठाण्यांच्या समन्वयातून पुढील तपास केला जात आहे.

# पुणे विमानतळावर बॉम्बची चिट्ठी सापडल्याने खळबळ! प्रजासत्ताक दिनापूर्वी हाय अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

दिल्ली येथून आलेल्या विमानात बॉम्ब ठेवल्याची चिठ्ठी विमानात सापडली होती, त्यानंतर विमानतळावर गोंधळ उडाला. सीआयएसएफकडून विमानाची तपासणी करण्यात आल्यानंतर कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. मात्र, या अफवेमुळे प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून (सीआयएसएफ) कडक करण्यात आली आहे.

बंदोबस्त वाढविण्यात आला असून क्विक रिऍक्शन टीम (क्यूआरटी) कार्यान्वित केली आहे.विमानतळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ३० जानेवारी २०२६ पर्यंत सर्व उड्डाणांसाठी १०० टक्के सेकंडरी लॅडर पॉइंट चेकिंग (एसएलपीसी) सक्तीचे करण्यात आले आहे. उड्डाणापूर्वी आणि आगमनानंतर अतिरिक्त तपासणी केली जाणार आहे. विमानतळ परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे. विमानतळाकडे येणाऱ्या सर्व प्रमुख मार्गांवर नाकाबंदी करून वाहनांची व प्रवाशांची कसून तपासणी केली जात आहे. संशयास्पद हालचालींवर विशेष लक्ष ठेवले जात



आहे.विमानतळ परिसरातील सीसीटीव्ही व इतर देखरेख यंत्रणांची कार्यक्षमता वाढविण्यात आली आहे. कार्गो टर्मिनलवरील सुरक्षा व्यवस्थाही अधिक मजबूत करण्यात आली आहे. ग्राउंड हँडलिंग कर्मचारी आणि इतर विमानतळ कर्मचाऱ्यांच्या हालचालींवर बारकाईने नजर असणार आहे. प्रवेश नियंत्रण अधिक कडक केले गेले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांची विशेष समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रवासी, विमाने आणि विमानतळाची पायाभूत सुविधा सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी अधिक सतर्क राहून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# भीमा नदीत जलपर्णीचा विळखा; शेतकरी आणि मच्छीमार अडचणीत

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड व शिरूर तालुक्याला वरदान ठरलेल्या भीमा नदीपात्रात या महिन्यात मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वाढत चालली आहे. काही ठिकाणी जलपर्णीने नदीपात्र वेढले आहे. त्यामुळे सध्या जलपर्णीमुळे भीमेचा श्वास गुदमरत चालल्याची वस्तुस्थिती पाहावयास मिळत आहे.

नदीपात्रात यंदा जलपर्णीची वाढ लवकर झाली असून, काही ठिकाणी नदीपात्र झाकून टाकले आहे. सध्या ही जलपर्णी छोटी असली तरी काही दिवसांतच झपाट्याने वाढणार आहे. या वाढणाऱ्या जलपर्णीमुळे दोन्ही तालुक्यांतील नदीकाठावरील गावातील मच्छीमारीचा व्यवसाय संकटात आला आहे. मासेमारी व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते. वाढलेली जलपर्णी काही दिवसांनी पाण्यातच कुजून जाते. त्यामुळे



नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येते. तसेच, डासांचाही प्रादुर्भाव वाढतो. याचा त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागतो. जलपर्णीची ही समस्या अनेक वर्षांपासून भेडसावत आहे. मात्र, याकडे कायमच दुर्लक्ष होत आल्याचा आरोप होत आहे. जलपर्णी वाढत जाते तसा शेतकऱ्यांसह परिसरातील नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. विद्युत मोटारीचे फुटवॉल्व्ह पाण्यामध्ये असतात. या फुटवॉल्व्हमध्ये जलपर्णी सतत अडकते. त्यामुळे शेतकऱ्यांना ही समस्या मोठ्या प्रमाणावर अडचणीची ठरते, तर डास आणि दुर्गंधीमुळे नागरिक हैराण होतात. यावर वेळीच उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# अल्पवयीनाला दुचाकी दिल्याप्रकरणी भावावर गुन्हा दाखल

**खडकवासला । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलांच्या हातात विनापरवाना वाहन देणाऱ्या पालकांसाठी नांदेड सिटी पोलिसांनी कडक इशारा दिला आहे. एका गंभीर गुन्ह्यात वापरलेली दुचाकी अल्पवयीन मुलाला चालविण्यास दिल्याबद्दल नांदेड सिटी पोलिसांनी संबंधित मुलाच्या भावाला सहआरोपी करीत गुन्हा नोंदविला आहे. नांदेड सिटी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धायरी परिसरात पूर्ववैमनस्यातून एका भाजी विक्रेत्यावर लोखंडी हत्याराने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील विधिसंघर्षित बालकाने गुन्ह्यासाठी क्विव्हा (एमएच ३१/सीएक्स/८३१४) ही दुचाकी वापरली होती. ही गाडी चालविण्याचा कोणताही परवाना मुलाकडे नसतानाही, त्याच्या घरच्यांनी ती त्याला उपलब्ध करून दिली होती, असे तपासादरम्यान निष्पन्न झाले. गुन्ह्यात वापरलेली दुचाकी अल्पवयीन मुलाला दिल्याबद्दल पोलिसांनी गांभीर्य लक्षात घेऊन मुलाचा भाऊ सुधीर हनुमंत गायकवाड (रा. धायरी, पुणे) याला या गुन्ह्यात सहआरोपी केले आहे. मुलांच्या गुन्हेगारी कृत्यांना किंवा बेजबाबदारपणे वाहन चालविण्यास प्रोत्साहन देणाऱ्या पालकांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर कारवाई केली जाईल, असे संकेत पोलिसांनी दिले आहेत. ही कारवाई पुणे शहरचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, पोलिस उप आयुक्त (परिमंडल ३) संभाजी कदम आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (सिंहगड रोड विभाग) अजय परमार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. नांदेड सिटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल भोस, पोलिस निरीक्षक (गुन्हे) प्रसाद राऊत आणि पीएसआय दत्तात्रय सावंत यांच्या पथकाने ही कारवाई केली

# पुणे महापालिकेत दारुण पराभव झालेल्या मनसेत मोठी उलथापालथ होणार; राज ठाकरे भाकरी फिरवणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिका निवडणुकीत (झींपश एश्रशलींळेप २०२६) झालेल्या दारुण पराभवानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत (चछड) मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. एकेकाळी पुणे महापालिकेत तब्बल २९ नगरसेवकांचा दबदबा असलेल्या मनसेला यंदाच्या निवडणुकीत एकही नगरसेवक निवडून आणता न आल्याने पक्षात आत्मचिंतन सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील मनसे शहर कार्यकारणीत मोठे बदल होण्याचे स्पष्ट संकेत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत.

मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी प्रतिक्रिया देताना, निवडणुकांमध्ये जय-पराजय होत असतात. यंदा पुणे महापालिका निवडणुकीत आम्ही पहिल्यांदाच शिवसेनेसोबत युती करून मैदानात उतरलो होतो. निकाल आमच्या अपेक्षेप्रमाणे लागले नाहीत. हा पराभव आम्ही मान्य केला असून लवकरच याबाबत पक्षांतर्गत आत्मचिंतन करण्यात येईल, असे स्पष्ट केले. निवडणूक प्रचाराबाबतही पक्षाकडून स्पष्ट कबुली देण्यात आली आहे. या निवडणुकीत प्रचाराची रणनीती आखताना आम्ही काही ठिकाणी कमी पडलो. ही निवडणूक एकप्रकारे धनशक्ती विरुद्ध संघटनशक्ती अशी होती. मात्र, याचा अर्थ असा नाही की आम्ही जबाबदारी झटकतो, असे सांगत संभूस यांनी येत्या काळात पुण्यात मनसेच्या कामकाजात बदल दिसतील, असा दावा केला. महत्त्वाचं म्हणजे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे लवकरच पुण्यात येऊन पदाधिकारी आणि




कार्यकर्त्यांची बैठक घेणार असल्याची माहितीही हेमंत संभूस यांनी दिली. राज साहेब आणि शर्मिला वहिनी यांच्याशी चर्चा झाल्यानंतर पुणे शहरात स्पष्ट बदल दिसतील. संघटनात्मक पातळीवर निर्णय घेतले जातील, असे ते म्हणाले.

# सहायक आयुक्त विठ्ठल कुबडे यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पदक

**पिंपरी । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील दोन अधिकाऱ्यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. सहायक पोलिस आयुक्त विठ्ठल कुबडे यांना पोलिस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल तर पोलिस निरीक्षक अमोल फडतरे यांना पोलिस शौर्य पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. या पदकांमुळे पिंपरी-चिंचवड पोलिस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत पिंपरी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त विठ्ठल कुबडे यांना राष्ट्रपतींचे पोलिस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल पदक जाहीर झाले. १५ सप्टेंबर १९९३ला कुबडे पोलिस सेवेत रुजू झाले. नाशिकच्या महाराष्ट्र पोलिस अकॅडमीतून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची पहिली नियुक्ती भंडारा येथे झाली. गोरेगाव, सालेकसा, शिवहोरा आदी नक्षली भागात त्यांनी काम केले. नक्षली चकमकीवेळी त्यांनी यशस्वी कामगिरी केली. नक्षली भागातील उत्कृष्ट कामगिरीनंतर परभणी, नांदेड, उस्मानाबाद आदी ठिकाणीही त्यांनी कामगिरीची चुणूक दाखवली. बुलडाणा येथे सहायक पोलिस





निरीक्षक पदावर त्यांनी काम केले आहे. २००७ ते २०१५ या कालावधीत लातूरमध्ये काम केल्यानंतर १५ जून २०१५ ला त्यांना पिंपरी येथे काम करण्याची संधी मिळाली. दरम्यान, १५ ऑगस्ट २०१८ रोजी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय कार्यान्वित झाले. त्यावेळी आयुक्तालय स्थापनेच्या दिवशी कुबडे यांना राष्ट्रपतींचे पोलिस दलातील गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल पदक जाहीर झाले होते. विठ्ठल कुबडे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिस दलात वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून गुन्हे शाखेसह पोलिस ठाण्यांचे प्रभारी म्हणून चमकदार कामगिरी केली. त्यानंतर सहायक आयुक्त म्हणून पदोन्नती झाल्यानंतर वाहतूक शाखेसह विविध विभागांची जबाबदारी सांभाळत तडीपार, मोका, स्थानबद्ध, अशा विविध कारवाया करून गुन्हेगारांवर जरब बसविली. या कामगिरीबद्दल तत्कालीन पोलिस आयुक्त व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कुबडे यांचा वेळोवेळी सन्मान करण्यात आला आहे. यात त्यांना सेवाकाळात १२०० रिवार्ड तर साडेचारशे प्रशंसापत्र मिळाली आहेत. नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये काम केल्याबद्दल विशेष सेवा पदक, अंतरिक सेवा पदकही मिळालेले आहे. पोलिस महासंचालक यांचे मानाचे सन्मानचिन्हही मिळालेले आहे. पोलिस दलातील कर्तव्य काळात अतिशय उत्कृष्टरित्या सेवा केल्याबद्दल त्यांना उत्कृष्ट सेवेबद्दलचे पदक जाहीर झाले. कुबडे यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपतींचे पदक मिळाल्याने कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अमोल फडतरे, पोलिस निरीक्षक

अमोल फडतरे यांनाही दुसऱ्यांदा राष्ट्रपतींचे पदक मिळाले आहे. फडतरे हे फेब्रुवारी २०१४ मध्ये पोलिस सेवेत उपनिरीक्षक म्हणून रुजू झाले. नाशिकच्या महाराष्ट्र पोलिस अकॅडमीतून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर फेब्रुवारी २०१५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात पहिली नियुक्ती झाली. अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागात 'सी-६०' या कमांडो पथकात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली. त्याबद्दल वेगवर्धीत पदोन्नती मिळून ते सहायक पोलिस निरीक्षक झाले. फडतरे यांनी कामगिरीचा आलेख उंचावत ठेवला. त्यामुळे २०२२ मध्ये पुन्हा वेगवर्धीत पदोन्नती मिळून ते पोलिस निरीक्षक झाले. पोलिस उपनिरीक्षक असलेले फडतरे यांनी अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागात उल्लेखनीय कामगिरी केल्याने पोलिस निरीक्षक पदापर्यंत त्यांना पदोन्नती मिळाली.